# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

Price ₹ 3/-

# संवाद

॥ स्वयमेव मृगेंद्रता ॥

**मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ॥**
**सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ॥**

**Vol.- 6 Issue 8 फेब्रुवारी - २०१४ February 2014**


## संपादकीय

सध्या आपल्या देशात सर्वत्र निवडणुकीचे पडघम वाजू लागलेले आहेत. गेल्या काही वर्षात अनेक समस्यांमध्ये वाढ झाल्याने देशात गोंधळाचे वातावरण आहे. त्यामुळे नागरिकांना आता बदल हवा आहे. हा बदल सत्तेतील परिवर्तनाने घडून येऊ शकेल अशी आशा लोकांना नेहमीच वाटत असते. ते साहाजिकच आहे.

वास्तविक आपल्या देशात नैसर्गिक संपत्ती भरपूर आहे. धान्य कोठारे कमी पडावीत अशी आज उत्तम पीक परिस्थिती आहे. विज्ञानाने मंगळापर्यंत भरारी मारलेली आहे. अनेक उत्तम योजनांमुळे भारत जगाच्या दृष्टिकोनातून आज महासत्तेच्या रांगेत आहे. तरी देखील समाजात एकमेकांबद्दल संशय, अनादर, अविश्वास ह्यामुळे देशात अशांतता वाढतच आहे.

भारताप्रमाणेच जगातील सर्वच देश निरनिराळ्या समस्यांनी ग्रासलेले असून तेथेही शांततेचा व निर्भय वातावरणाचा अभाव आहे. या संदर्भात आपण जरा खोलवर जाऊन विचार केला तर आपणास आढळून येते की मानवी विश्वात दोन प्रमुख प्रवाह दिसतात. संपूर्ण विश्वात बंधुत्व, ऐक्य, स्वातंत्र्य, समता, समृद्धी, शांतता या दिशेने जाणारा एक प्रवाह आहे; तर दुसरा प्रवाह युद्धखोर प्रवृत्ती, भ्रष्टाचार, दहशतवाद यांच्याद्वारे विनाशाच्या दिशेने जाणारा आहे. विश्वातील प्रत्येक देश स्वातंत्र्याचा उपभोग घेऊन दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर घाला न घालता विश्वबंधुत्वाकडे म्हणजेच 'वसुधैव कुटुंबकम्' या ध्येयाकडे वाटचाल करणारा असावा आणि सर्वच देशांना शांततेच्या सहजीवनाचा लाभ देणाऱ्या आदर्श मार्गानेच सर्वांनी वाटचाल करावी हाच उत्तम मार्ग होय.

अनिर्बंध स्वातंत्र्यामुळे सर्वच देश विघटन-विनाशाच्या दिशेने जात आहेत आणि सार्वजनिक नीतिमत्ताही घसरत चाललेली आहे. कोणत्याही देशाने कितीही प्रगती केली तरी माणसातील विवेकवृत्तीच्या अभावामुळे ह्या प्रगतीला बाधा पोहोचते आहे. आज संगणकक्षेत्रात सर्वच देशांनी नेत्रदीपक प्रगती केलेली आहे. भौतिक क्षेत्रात पुढे जाण्यास ह्या संगणकज्ञानाचा सर्वांनाच उपयोग होत आहे. परंतु येथेही आता फसवणुकीचे प्रकार फार मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. हा छुप्या भ्रष्टाचाराचा व युद्धखोरीचाच प्रकार आहे.

आपली प्रत्येक कृती विवेकावर आधारित असावी. आपल्या वर्तनाला विवेकाचं अधिष्ठान हवं. ''विवेकभ्रष्टानां भवति विनिपात: शतमुखा: '' किंवा ''सहसा विदधित न क्रियाम्। अविवेक: परमापदां पदं।।'' ही संस्कृत सुभाषिते सदैव ध्यानांत ठेवावीत व त्यानुसारच आपले वर्तन असावे. हा नियम व्यक्तीला लागू आहे तसाच तो समाजाला व जगातील प्रत्येक राष्ट्राला लागू आहे. विनाशाचा हा प्रश्न विचाराच्या परिवर्तनाने म्हणजेच विवेकी वृत्तीच्या अवलंबानेच सुटणार आहे याची प्रत्येकाने मनाशी खूणगाठ बांधावी. 'विवेके क्रिया आपुली पालटावी' या समर्थवचनाचे येथे आपल्याला स्मरण होते.

मी कोण आहे? माझा जन्म कशासाठी? युद्ध, मारामारी यासाठी की शाश्वत आनंद, समृद्धीच्यासाठी? याविषयीची योग्य जाणीव नागरिकांच्या मनात रुजविणे अत्यावश्यक आहे. ह्या दृष्टिकोनातून पहिले तर आपणास आढळून येईल की भारताकडे अध्यात्मिक ज्ञानाची, त्याच्या जागृतीची परंपरा फार पूर्वीपासूनच आहे, यामुळेच आपली लोकशाही अत्यंत कठीण प्रसंगातून जात असूनही बळकट आहे. ह्या अध्यात्मिक ज्ञानाचे नेतृत्व करण्याची क्षमता आजही आपल्या देशात आहे. भारताने पुढाकार घेतल्यास जगातील सर्व विचारवंतांच्या सहकार्याने विश्वातील हे विघटन खरोखरीच थांबू शकेल.

तेव्हा ज्येष्ठांनो, 'ह्या निवडणुका येतील अन् जातील पण ह्यानंतर काहीच साध्य होणार नाही.' असे मात्र म्हणू नका. आणि निराशही होऊ नका. आता खऱ्या परिवर्तनास सुरवात झालेली आहे असे समजून चाला आणि भ्रष्टाचाऱ्यांना साथ न देता नीतिमान उमदेवारालाच आपले अमूल्य मत द्या. आपले कर्तव्य बजावल्याचे समाधान घ्या.

भौतिक प्रगतीबरोबरच प्रेम, आनंद, संतोष, कृतज्ञता, विश्वबंधुत्व, हे मानवाचे खरे आध्यात्मिक स्वरूप आहे. भारताची हीच परंपरा प्राचीन काळापासून चालत आलेली असल्याने आजही याची कास धरल्यास भारत खरोखरीच महासत्तेत प्रवेश करेल; इतकेच नव्हे तर जगालाही मार्गदर्शन करेल.


शरद शिंगवेकर
भ्रमणध्वनी : ९४०५०२६४१२

(Ref : Corporate Centre e-Circular No.CDO/P&HRD-PM/71/2013-14 Dated 13-02-2014 )

**RATES OF DEARNESS RELIEF PAYABLE TO PENSIONERS** **Annexure - I**

**WHO HAVE RETIRED (A) PRIOR TO 1-11-1987 and (B) BETWEEN 1-11-1987 & 31-10-1993**

| Sr. No. Basic Pension + F.D.R. (as applicable) | Dearness Relief for the months from **February 2014 to July 2014** (Average Index - 5501) (Slabs - 1225) |
|---|---|
| i) Upto Rs.1,250=00 | 820.75 % of aggregate of Basic Pension & F.D.R. |
| ii) Rs.1,251=00 to Rs.2,000=00 | Rs.10,259=37 + 673.75 % of aggregate of Basic Pension & F.D.R. in excess of Rs.1,250=00 |
| iii) Rs.2001=00 to Rs.2,130=00 | Rs.15,312=49 + 404.25% of aggregate of Basic Pension & F.D.R. in excess of Rs.2,000=00 |
| iv) Above Rs.2,130=00 | Rs.15,838=01 +208.25% of aggregate of Basic Pension & F.D.R. in excess of Rs.2,130=00 |

**DEARNESS RELIEF PAYABLE TO PENSIONERS**
**WHO HAVE RETIRED ON OR AFTER 1-11-1993 UPTO 31-10-2002**

| Sr. No. Basic Pension | Dearness Relief for the months from **February 2014 to July 2014** (Average Index - 5501) (Slabs - 1088) |
|---|---|
| i) Upto Rs.2,400=00 | 380.80 % of Basic Pension |
| ii) Rs.2,401=00 to Rs.3,850=00 | Rs.9,139=20 + 315.52 % of Basic Pension in excess of Rs.2,400=00 |
| iii) Rs.3,851=00 to Rs.4,100=00 | Rs.13,714=24 + 184.96 % of Basic Pension in excess of Rs.3,850=00 |
| iv) Above Rs.4,100=00 | Rs14,176=64 + 97.92 % of Basic Pension in excess of Rs.4,100=00 |

**Dearness Relief payable to Pensioners who have retired on or after 1-11-2002 To 31-10-2007**
**for the months from February 2014 to July 2014**
(Average Index - CPI - for quarter ended December 2013 :- 5501 ; and No.of Slabs - 803)

**Rate of Dearness Relief on Pension :- 144.54 % of Basic pension**
(Ignore decimals from 3rd place onwards)

**Dearness Relief to Pensioners who Retired on or after 1-11-2007**
**for the months from February 2014 to July 2014**
(Average Index - CPI - for quarter ended December 2013 :- 5501 ; and No.of Slabs - 666)

**Rate of Dearness Relief on Pension :- 99.90 % of Basic pension**
(Ignore decimals from 3rd place onwards)

## Dearness Relief payable to Family Pensioners **Annexure - II**

(i) Dearness Relief for Family Pensioners in respect of pensioners who died or retired
(a) before 1-11-1993 (b) on or after 1-11-1993 but before 1-4-1998 and
(c) on or after 1-11-2002 will be paid as per the tables given for the pensioners in Annexure-I **(given above)**

(ii) The Dearness Relief of Family Pensioners in respect of pensioners who died or retired on or after 1-4-1998 but before 1-11-2002 will be as per the following Table :-

| Sr.No. Basic Family Pension | Dearness Relief for the months from **Feb. 2014 to July 2014** (Average Index - 5501) (Slabs - 954) |
|---|---|
| i) Upto Rs.3,550=00 | 228=96 % |
| ii) Rs. 3,551=00 to Rs. 5,650=00 | Rs. 8,128=08 + 190.80 % of Basic Family Pension in excess of Rs. 3,550=00 |
| iii) Rs.5,651.00 to Rs.6,010.00 | Rs. 12,134.88 + 114.48 % of Basic Family Pension in excess of Rs.5,650.00 |
| iv) Above Rs.6,010.00 | Rs.12,547.00 + 57.24 % of Basic Family Pension in excess of Rs.6,010.00 |

# S.B.I. Pensioners' Association (Mumbai Circle), Pune

## Panaji (GOA) Zonal Sub-Centre

### Notice of the Annual General Meeting

16th Annual General Meeting of our Panaji (Goa) Zonal sub Centre will be held on **Sunday the 6th April 2014** at 9.30 a.m. at State Bank of India Complex, Patto Plaza, Behind Kadamba Bus Terminal, New Building of Staff Learning Centre, Panaji, Goa, to transact the following business.

**AGENDA**

1) To condole the death of Bank's pensioners / family pensioners and Associate members whose names were reported after the last AGM.
2) To confirm the Minutes of the last AGM.
3) Managing Committee's report for the year 2013 to be read, discussed and adopted.
4) To honour the senior members who have completed / will be completing 75 years of age during the period 7th April 2013 to 6th April 2014.
5) Speech of the Chief Guest.
6) Speech of the President of Panaji ZSC.
7) Speeches of the special invitees and office bearersof our Circle Association.
8) Elections of the office bearers and Commitee members of the Panaji (Goa) ZSC for the period 2014 - 2016. Association members desirous to stand for the election as Office bearers and Committee members to work for the Association, are requested to submit their nomination in writing before 15 days of the date of the Annual General Meeting, to the Secretary, Panaji, ZSC, at the following address:

   Mr I.H. Dias, Secretary, S.B.I. Pensioners' Association, Flat 3, Apple Blossom, Miramar, SBIE Co-op Hsg Socy Ltd., La Campala, Panaji, Goa -403 001.
9) Any other matter with the permission of the chair.

All the members from Goa, Ratnagiri and Sindhudurg districts are requested to attend the meeting.

The **"Pensioners' Meet"** arranged by the Bank on the same day will start soon at the convenient time when the Banks VIPs arrive. All the members in the area of the operation of Panaji (Goa) module are requested to attend the meeting. Please inform other members known to you regarding the AGM and the Pensioners Meet. Snacks/Tea and lunch will be served during the AGM.

Please note that no separate notice of this Annual General Meeting will be sent to the members.

***Isac Hilario Dias***
Secretary

(Notice in Marathi has been printed on next page)

************************************

# स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे
# पणजी (गोवा) झोनल सब्-सेंटर
## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटिस

पणजी झोनल सब्-सेंटरची १६ वी वार्षिक सर्व साधारण सभा रविवार दि. ६ एप्रिल २०१४ रोजी सकाळी ९।। वाजतां स्टेट बँक कॉम्प्लेक्स, पट्टो प्लाझा, कदंब बस टर्मिनलचे मागे, स्टाफ ट्रेनिंग सेंटर (नवीन इमारत), पणजी (गोवा) येथे आयोजित केली आहे. या सभेत खालील कामकाज होईल.

### कार्यक्रम पत्रिका

१) गतवर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर ज्या मृत सभासदांची नांवे कार्यालयास कळविलेली आहेत अशा मृत सभासदांना श्रद्धांजली वाहणे.

२) गतवर्षीच्या सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून मंजूर करणे.

३) कार्यकारी मंडळाच्या २०१३ सालच्या अहवालास मंजूरी देणे.

४) ७ एप्रिल २०१३ ते ६ एप्रिल २०१४ या कालावधीत ज्यांच्या वयास ७५ वर्षे पूर्ण झालीत/होतील अशा सर्व ज्येष्ठ सभासदांचा सत्कार करणे.

५) माननीय प्रमुख पाहुण्यांचे भाषण.

६) पणजी झोनल सब-सेंटरच्या अध्यक्षांचे भाषण.

७) उपस्थित सर्कल पदाधिकाऱ्यांची भाषणे

८) २०१४ -२०१६ या द्वैवार्षिक कालावधीसाठीच्या असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांच्या व कमिटी मेंबर्सच्या निवडणूका घेणे. ज्यांना कोणत्याही पदासाठी निवडणूकीला उभे रहायची इच्छा असेल अशा सभासदांनी आपले अर्ज लिखित स्वरूपात सेक्रेटरी श्री.डायस यांचेकडे खालील पत्त्यावर, वार्षिक सभेच्या तारखेच्या १५ दिवस आधी पोहोचतील अशा बेताने पाठवावेत.

श्री.आय.एच.डायस, सेक्रेटरी, पणजी झोनल सब्-सेंटर, फ्लॅट नं.३, ॲपल ब्लॉसम, मिरामार, स्टेट बँक सोसायटी, ला कम्पाला, पणजी, गोवा - ४०३००१

९) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयांवर चर्चा करणे.

गोवा तसेच रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व सभासदांना विनंती की त्यांनी वरील वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित रहावे. तसेच वर उल्लेख केलेल्या सभास्थानी त्याच दिवशी आपल्या बँकेने पेन्शनर्स सभा (Pensioners' Meet) आयोजित केली आहे. तरी याही सभेस सर्वांनी उपस्थित रहावे ही विनंती. कृपया वरील दोन्ही सभांबद्दल आपल्या ओळखीच्या सभासदांना सूचना द्यावी.

चहा/अल्पोपहार व भोजनाची व्यवस्था सभास्थानीच केली आहे. या वार्षिक सर्वसाधारण सभेची वेगळी नोटीस सभासदांना पाठविली जाणार नाही याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी.

**आय. एच्. डायस**
सेक्रेटरी

*************************************************************

### अभिनंदनीय

नांदेड येथील एक सभासद श्री.एस्.टी.कुलकर्णी यांचा नातू चि.प्रणव अजय कुलकर्णी हा सध्या लाल बहादूर शास्त्री विद्यालय उदगीर येथे ६ वी इयत्तेत शिकत असून त्याने 'लातूर फेस्टिवल-जाने.२०१४' अंतर्गत घेतलेल्या चित्रकला स्पर्धेमध्ये उदगीर तालुक्यामधून दहा हजार स्पर्धकांमध्ये तृतीय क्रमांक मिळवला. माजी मुख्यमंत्री कै.विलासराव देशमुख यांचे सुपुत्र श्री.धीरज देशमुख यांचे शुभहस्ते १२ जानेवारी २०१४ रोजी झालेल्या समारंभात चि.प्रणवला प्रमाणपत्र व बक्षीस देण्यात आले. या यशाबद्दल चि.प्रणवचे असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन !

- सेक्रेटरी

### अभिनंदनीय

आपल्या नांदेड युनिटचे सेक्रेटरी श्री.काशिनाथ कांबळे हे आपल्या बँकेच्या नांदेड येथील क्षेत्रीय व्यवसाय कार्यालयात रिकव्हरी ऑफिसर म्हणून कार्यरत असून बँकेच्या विविध शाखांमधील कर्ज खात्यांमध्ये, विशेषत: बँकेच्या कृषी उत्पन्न बाजार समिती (नांदेड) शाखेतील एन्.पी.ए.खात्यांमधील २०१२-१३ या कालावधीत बकाया रकमेपैकी रु.१ कोटी १४ लाख इतकी विक्रमी वसुली करून त्यांनी एन्.पी.ए.लेव्हल कमी केली आहे व औरंगाबाद विभागात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या उत्कृष्ट कार्याबद्दल आंचलिक कार्यालय, औरंगाबाद येथे उपमहाप्रबंधक साहेबांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. श्री.काशिनाथ कांबळे यांनी केलेल्या बँकेच्या विक्रमी रिकव्हरी बद्दल असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन !

- सेक्रेटरी

# स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन, (मुंबई सर्कल), पुणे
## अमरावती झोनल सब-सेंटर
### * वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस *

दि. १५ जानेवारी २०१४ रोजी झालेल्या अमरावती झोनल सब-सेंटरच्या कार्यकारिणी सभेमध्ये ठरविल्याप्रमाणे अमरावती झोनल सब्-सेंटर मधील (अमरावती, अकोला, वाशिम, खामगांव (बुलडाणा) व यवतमाळ जिल्ह्यातील) सर्व सभासदांना कळविण्यात येते की, अमरावती झोनल सब्-सेंटरची प्रथम वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दि. १४ मार्च २०१४ रोजी डॉ. जोशी हॉल, जोग चौक, भारतीय स्टेट बँक, मुख्य शाखा अमरावती समोर, अमरावती येथे सकाळी १० वाजता आयोजित केली आहे. या सभेत खालील कामकाज होईल.

### कार्यक्रम पत्रिका

१) अमरावती झोनल सब-सेंटरच्या वर्ष २०१४-१५ व २०१५-१६ या कालावधी करिता निवडणूक कार्यक्रम होईल. श्री.बाळासाहेब काळे, अमरावती (मो.-०९८८१९०३६३२) हे निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहतील व निवडणूक प्रक्रिया चालू करून निवडणूका घेतील. (इच्छुक उमेदवारांनी पुढील पानावर छापलेल्या नॉमिनेशन फॉर्म अनुसार उमेदवारी अर्ज श्री. काळे यांचे पत्त्यावर ७ मार्च २०१४ पर्यंत पोहोचेल अशा बेताने पाठवावा)

२) नवनिर्वाचित कार्यकारिणीचा पदग्रहण कार्यक्रम होईल व त्यानंतर नवनिर्वाचित सचिव पुढील कार्यक्रमपत्रिकेनुसार कामकाज चालवतील.

३) दि. १ एप्रिल २०१३ ते १४ मार्च २०१४ पर्यंत च्या कालावधीत निधन झालेल्या सभासदांना श्रद्धांजली वाहणे.

४) दि. ४ ऑगस्ट २०१३ च्या अमरावती झोनल सबसेंटरच्या स्थापनेनिमित्त झालेल्या सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे. (हा वृत्तांत ऑक्टोबर २०१३ दिवाळी विशेषांक संवाद मासिकात प्रसिद्ध झाला आहे)

५) मा. सचिवांद्वारे झोनल सब-सेंटरच्या स्थापनेपासूनच्या वाटचालीचे अहवाल वाचन.

६) १ एप्रिल २०१३ ते १४ मार्च २०१४ या काळात वयाची ७५ वर्षे पूर्ण झालेल्या ज्येष्ठ सभासदांचा सत्कार करणे. (अशा सभासदांना वैयक्तिक निमंत्रण पत्र पाठविण्यात येईल)

७) असोसिएशनच्या चालू घडामोडींविषयी मान्यवरांद्वारे विवेचन.

८) अध्यक्षांचे भाषण.

### भोजनावकाश - दुपारी १ ते २

या सभेदरम्यान दुपारी ३ वाजता नागपूर झोनल ऑफिस झोन-२ चे उप-महाव्यवस्थापक श्री. सी. एस. कृष्णमूर्ती, यांचे अध्यक्षतेखाली स्टाफ पेन्शनर्स मीट आयोजित केली आहे. सर्व सभासद, सहसभासद व फॅमिली पेन्शनर्स यांनी वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे ही विनंती.

**ज्ञानप्रकाश खोब्रागडे**
सचिव, (प्रभारी कार्यकारिणी)

***************

टीप- १) सभास्थानी सकाळी १० वा. पुरेशी गणसंख्या नसल्यास आयोजित सभा अर्ध्या तासासाठी बरखास्त करून सकाळी १०.३० वाजता त्याच ठिकाणी पुन्हा भरविण्यात येईल. या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

२) सभासदांना या सभेची वेगळी निमंत्रण पत्रिका पाठविण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. गरजेनुसार कार्यक्रमाचे क्रमवारीत बदल होऊ शकतो.

**- सचिव**

(द्वैवार्षिक निवडणूक कार्यक्रम व नॉमिनेशन फॉर्मचा नमुना पुढील पानावर)

****************************************************************************

## अमरावती झोनल सब्-सेंटरच्या कार्यकारिणीचा द्वैवार्षिक निवडणूक कार्यक्रम - २०१४-१५ व २०१५-१६

दि.१५ जानेवारी २०१४ रोजी झालेल्या अमरावती झोनल सब्-सेंटरच्या अस्थायी कार्यकारिणीच्या सभेत ठरल्याप्रमाणे अमरावती झोनल सब्-सेंटरच्या कार्यक्षेत्रातील सर्व सभासदांना कळविण्यात येते कीं, २०१४-१५ व २०१५-१६ या द्वैवार्षिक कालावधीसाठी दि.१४ मार्च २०१४ रोजी आयोजित केलेल्या पहिल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अमरावती झोनल सब्-सेंटरच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडणूकीचा कार्यक्रम घेण्याचे ठरले आहे. ज्या सभासदांना अमरावती झोनल सब्-सेंटरच्या खालील पदांसाठी पदाधिकारी म्हणून काम करण्याची इच्छा असेल त्यांनी सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात नॉमिनेशन अर्ज भरून निवडणूक अधिकारी श्री.बाळासाहेब काळे यांचे घरच्या पत्त्यावर दि. ७ मार्च २०१४ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठवावेत.

कार्यकारिणीचे प्रारूप

| क्र. | पदनाम | पदसंख्या |
|---|---|---|
| १) | अध्यक्ष | १ |
| २) | उपाध्यक्ष | १ |
| ३) | सचिव | १ |
| ४) | सहसचिव (अकोला, यवतमाळ व बुलढाणा जिल्ह्यामधून) | १ |
| ५) | कोषाध्यक्ष | १ |
| ६) | कार्यकारिणी सदस्य | ४ |
| | **एकूण सदस्य संख्या -** | **९** |

वरील पैकी क्र.१ ते ५ या पदांसाठीच वार्षिक सभेमध्ये निवडणूका होतील. अमरावती, अकोला, यवतमाळ व खामगांव (बुलढाणा) या युटिचे सेक्रेटरी हे कार्यकारिणीचे पदसिद्ध सदस्य असतील. त्यामुळे त्या पदांसाठी या सभेत निवडणूका होणार नाहीत. मतदान पत्रिका सभास्थानी प्रत्येकास मिळेल. निवडणूक अधिकारी श्री.काळे यांचा पत्ता नॉमिनेशन फॉर्ममध्ये शेवटी दिला आहे.

निवडणूकीसाठी वेळेत आलेल्या अर्जांची (नॉमिनेशन्सची) छाननी करून पात्र (Valid) उमेदवारांची नांवे वार्षिक सभेच्या दिवशी सुरूवातीला जाहीर करण्यात येतील. वरील पैकी क्र.१ ते ५ या पदांसाठी एकापेक्षा जास्त उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यास, ज्या पदांसाठी जास्त अर्ज आले असतील त्या पदांसाठीच निवडणूक होईल व त्यानंतर निवडणूक अधिकारी नवनिर्वाचित सर्व पदाधिकाऱ्यांची नावे जाहीर करतील व नविन कार्यकारिणी अस्तित्वात येईल. त्यानंतर सोबतच्या नोटिसीतील कार्यक्रम पत्रिकेप्रमाणे नवनिर्वाचित सचिव सभेचे कामकाज पाहतील.

**- सचिव**

(नॉमिनेशन फॉर्मचा नमुना पुढील पानावर छापला आहे)

*****************************************

### अभिनंदनीय

नांदेड येथील एक सभासद श्री.एम्.एच्.चाकोते यांची नात (डॉ.गिरीश चाकोते यांची सुकन्या) कु,आरोही ही ऑक्सफर्ड इंटरनॅशनल स्कूल, फरांदेनगर (नांदेड) येथे सध्या दुसऱ्या इयत्तेत शिकत असून १३ व्या नॅशनल सायबर ऑलिंपियाड स्पर्धेत तिने शाळेत प्रथम क्रमांक पटकावला असून तिला सुवर्ण पदकही मिळाले आहे. या तिच्या यशाबद्दल आपल्या असोसिएशनतर्फे मन:पूर्वक अभिनंदन व पुढील यशस्वीसाठी शुभेच्छा !

- सेक्रेटरी

### निवेदन

**'संवाद' लेख स्पर्धा २०१४**

'लक्षात असू दे' स्पर्धेची अंतिम मुदत ३१ मार्च २०१४ आहे. जास्तीत जास्त सभासदांनी, सहसभासदांनी आपले लेख तत्पूर्वी पोस्टाने (रजिस्टर, कुरीयरने नव्हे) पाठवावेत.

अधिक माहितीसाठी (नियम, अटी) 'संवाद' चा जानेवारी २०१४चा अंक पाहावा.

संपादक मंडळ

State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle) Pune

# Amravati Zonal Sub-centre

Nomination Form

Form of Nomination paper for election to the post of the Members of the Managing Committee of the State Bank of India Pensioners' Association **Amravati Zonal Sub-Centre** for the period from 2014-15 & 2015-16

Name of the Candidate with Membership No. :____________________

Address of the Candidate :____________________

:____________________

**Post applied for** .. .. .. .. :____________________

Name of the Proposer with Membership No. :____________________

Address of the Proposer .. .. .. :____________________

:____________________

Name of the Seconder with Membership No. :____________________

Address of the Seconder .. .. .. :____________________

:____________________

Place :

____________________ ____________________
(Signature of Proposer) (Signature of the Seconder)

Date :

**Declaration by the Candidate**

I, Shri./Shrimati____________________ hereby signify my willingness to serve as Member of the Managing Committee for the post applied for of the SBI Pen Assn, Amravati ZSC, Amravati____________________ if I am elected to the said post.

Place :

Date :

____________________
(Signature of the Candidate)

*Nomination Forms duly completed in all respect is to be sent to **Shri.Balasaheb P.Kale, Election Officer** so as to reach him on or before Friday the 7th march 2014 by Regd.Post / Speed Post / Courier or by Ordinary Post at the following address : **Shri.Balasaheb P.Kale, Plot No.72-A, Krishnarpan Colony, Dasara Maidan Road, H.V.P.M. Post Office, Amravati - 444 605. (His Mobile No. 09881903632)***

## S.B.I.Pensioners' Association (Mumbai Circle) Pune

## NAGPUR ZONAL SUB-CENTRE

### Minutes of the Annual General Meeting held on 24th November 2013

A Pensioners' Meet followed by Annual General Meeting was held by SBI Pensioners' Association (Mumbai Circle), Nagpur Zonal Sub-Centre on Sunday the 24th November 2013 at State Bank of India, Zonal Office, Nagpur during 11.00 a.m. to 3.00 p.m. Shri B. Shankar, Dy. General Manager, SBI, Zone-1, Zonal Office, Nagpur inaugurated the Pensioners' Meet.

Shri.Sudhir Agrekar, Secretary, in his introductory speech, told that the Zonal Office functionaries are giving courteous service to the Pensioners. He stressed the need to open more dispensaries especially in eastern Nagpur as the Pensioners are living in different parts of the city and it is difficult for them to come to VRCE or Zonal Office dispensaries. He also requested the management to open the dispensary at Wardha as the Branch Manager of Wardha assured to provide the space in the Wardha Main Branch for the proposed dispensary. He also requested to provide Revised Family Pension Advices to all the Pensioners so that in case of any mishap their family members will not face any difficulties in getting family pension. He requested the Management to fix up the timings of the VRCE dispensary as there is no fixed time for the dispensary and the Pensioners are required to take appointment from the Doctor for every time. At many times, the pensioners from far off places have to return back due to non availability of the Doctor.

Shri B.Shankar Dy. General Manager, in his address highlighted the various efforts made by the Bank towards relief of the Pensioners and admired the Pensioners' Association for their working and organized efforts. He told the forum that it may not be possible to open more dispensaries in the city. However, he told that the pensioners may take the advantage of the existing dispensaries. He assured that he will look into the problem of timings of VRCE Dispensary and also one at Wardha and will give solution within 3 months. He also told that the Pensioners are very important for their family and they should take care of their health and also should not move outside to avoid any mishappening. He wished the Association every success in their endeavour while extending support from the Bank.

Shri. Narsing Mehta, Chief Manager (P&HR) also told in his speech that he will give every support to the pensioners. Shri P.B.Rathore, President, SBI Pensioners' Association (Mumbai Circle) Nagpur Zonal Sub-Centre thanked the management for providing every support. Shri Ashok Patrikar gave vote of thanks for the Pensioners' Meet. The Meet was followed by Annual General Meeting of the Association's Nagpur Zonal Sub-Centre.

The Annual General Meeting started with paying homage to all the deceased pensioners/family pensioner who expired during the year 2012-13 which includes two office-bearers i.e. Shri.T.G.Meshram and Shri Murar Gupte as also Shri G.M.Bhakey who was one of the senior members under whose guidance the Nagpur ZSC achieved more heights in the organizational work.

Thereafter, Shri. Sudhir Agrekar, Secretary, in his introductory speech gave brief information about the progress of the Association during the year 2012-13. Total membership was increased by about 134 pensioner members during the year. New 98 Associate members and 1 Family pensioner member were also enrolled during the year. Shri..Agrekar gave information about the progress of the Court Cases (Gratuity Case and 50% pension case). He also told that due to luke warm support from

Head Quarters they have dropped the idea of acquiring the Office space at Nagpur and refunded the Donations collected from the Members. He also appealed all the members to check their accounts and if they have not received back the donation amount they should immediately contact the Secretary or Treasurer.

Shri. P.B.Rathore, President, also read out the message received from Shri V.D.Deshpande (who is presently in USA).

The Pensioners who have completed the age of 75 years were felicitated by offering them a Shawl and Sriphal. This programme was compered by Shri. Gundapawar and Shri. Khekhale. All the pensioners were also requested to give introduction. This was followed by an open session where member's queries were satisfactorily answered by the dignitaries on the dais.

The Programme was compered by Shri. Deepak Daryapurkar, in an excellent manner. The Meeting concluded with the National Anthem.

Shri. Narendra Joshi, one of our members, provided excellent Breakfast & Lunch at nominal cost. Shri Prakash Badge gave vote of thanks for the Annual General Meeting. Mementos were presented to all the members who attended the meeting.

Around 250 pensioners were present. S/Shri. A.P.Valokar, Prakash Badge, Vijay Jagdale, Dhananjay Deshmukh, Dhananjay Godbole, N.A.Diore, Bapu Tumbde, Khekale, Mahatme, Gundapawar, Sudhakar Gadekar, R.G.Warambhe, Ramesh Dekate, Ashok Patrikar & others made streaneous efforts to make the programme a grand success.

***Sudhir Agrekar***
Secretary

## नेत्र चिकित्सा शिबीर

'वासन आय-केअर' आणि आपल्या असोसिएशनच्या पुणे झोनल सब्-सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने **मोफत नेत्र चिकित्सा शिबीर - दि.१० ते १४ मार्च २०१४** या कालावधीत खालील ठिकाणी आयोजित केले आहे. तरी सर्व सभासद, सहसभासद व फॅमिली पेन्शनर्स यांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी या शिबीराचा अवश्य लाभ घ्यावा.

**स्थळ : वासन आय केअर हॉस्पिटल,**
**अमानोरा हॉल जवळ, मगरपट्टा सिटी समोर,**
**हडपसर-खराडी लिंक रोड, पुणे. फोन न: 020 - 39890300**

**वेळ : सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत**

**होणाऱ्या चाचण्या : 1) Master Eye checkup which includes Auto Refractive Test, Vision Test, Cataract Checkup, Glaucoma Checkup, Retina Checkup & Eye Pressure Checkup**

**2) Free consultation from Specialists**
**10% off on Optical; 5% off on Surgery**

**विशेष सूचना :** मोफत चाचण्यांची सवलत ६० वर्षावरील सभासद व कुटुंबीयांसाठीच राहील. ६० वर्षाखालील सभासद वा कुटुंबीयांसाठी तपासणी फी मधे ५०% सवलत, म्हणजे रु.२५०/- ऐवजी रु.१२५/- फी आकारली जाईल.

**- सेक्रेटरी, पुणे झोनल सब्-सेंटर**

# डोंबिवली-कल्याण विभाग पेन्शनर्स सभा

२० डिसेंबर २०१३ रोजी बँकेच्या डोंबिवली शाखेतर्फे सायं. ५ वाजता डोंबिवली-कल्याण विभागातील निवृत्त कर्मचाऱ्यांचा मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यास १२४ सभासद व सहसभासद हजर होते. या वर्षी दरवर्षीपेक्षा जास्त उपस्थिती असल्याने शाखाधिकारी श्री.सांगळे यांनी समाधान व्यक्त केले. या मेळाव्यास सर्कल असोसिएशनचे अध्यक्ष श्री.व्ही.एम.गोखले, मुंबई झोनचे अध्यक्ष श्री.एस.बी.गोखले, तसेच पेन्शनर्स फेडरेशनचे माजी अध्यक्ष श्री.बी.जी.दांडेकर हे उपस्थित होते.

सुरूवातीस शाखाधिकारी श्री.सांगळे, जे स्टेट बँक ऑफिसर्स असोसिएशनच्या मुंबई झोनचे चीफ रीजनल सेक्रेटरी देखील आहेत, ह्यांनी सर्व उपस्थितांचे हार्दिक स्वागत केले. त्यानंतर मुंबई झोनल सब्-सेंटरचे अध्यक्ष श्री.एस.बी.गोखले यांचा त्यांच्या पंचाहत्तरी निमित्त सत्कार करण्यात आला. हा सत्कार करण्याचा पहिला मान डोंबिवली-कल्याण विभागाला मिळाल्याबद्दल सर्वांनी समाधान व्यक्त केले. त्याच बरोबर शाखेतर्फे श्री.बी.ई.जोशी, श्री.केंगे व श्रीमती कुलकर्णी यांचाही पंचाहत्तरी निमित्त शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. हे तिघेही या ब्रँचचे खातेदार आहेत. गेल्या २-३ वर्षांपासून हा पंचाहत्तरीबद्दलच्या सत्कारचा उपक्रम आपल्या सूचनेनुसार शाखेने सुरू केला आहे.

त्यानंतर 'हर्बल व पंचकर्म चिकित्सा' या विषयांतील तज्ञांकडून मधुमेह, हृदयविकार, किडनी/लिव्हर या संबंधित आजारांवर हर्बल/पंचकर्म चिकित्सेमुळे काय फायदा होतो हे समजावून सांगून मार्गदर्शन करण्यात आले. तसेच बँकेच्या जनरल हेल्थ इन्शुरन्स स्कीमबद्दल सविस्तर माहिती बँकेच्या संबंधित अधिकाऱ्याने सर्वांना दिली. यानंतर श्री.एस.बी.गोखले यांनी आपल्या भाषणात आपल्या असोसिएशनबद्दल सविस्तर माहिती दिली. तसेच प्रत्येकाने स्वत:च्या पेन्शन खात्यासह सर्व खाती जॉइंट करून घेण्याचा सल्ला दिला. ज्यांना ते शक्य नसेल अशांनी निदान नॉमिनेशन करणे आवश्यक आहे की जेणे करून आपल्या पश्चात खात्यावरील व्यवहार सुकर होतात असेही त्यांनी सांगितले.

सर्कल प्रेसिडेंट श्री.व्ही.एम.गोखले यांनी आपल्या भाषणात बँकेच्या संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी झालेल्या प्रासंगिक भेटीचे वेळी झालेल्या पेन्शन संदर्भातील बोलण्यांबद्दल, तसेच आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी दाखल केलेल्या केसेस संबंधी माहिती दिली व त्यासंबंधीच्या सभासदांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरें दिली. त्याच बरोबर इच्छापत्राबद्दलची आवश्यकता अधोरेखित केली. यानंतर श्री.दांडेकर यांनी सभेला संबोधित करून आपल्या फेडरेशनला कोर्ट केसेस कां दाखल कराव्या लागल्या व अजूनही त्यांचा निर्णय कां होत नाही याची माहिती सांगितली. त्याच बरोबर नेत्रदानाचे महत्त्व काय आहे हे स्वत:च्या उदाहरणावरून सभासदांना आग्रहपूर्वक सांगितले व सभासदांच्या नेत्रदानाबद्दलच्या शंकांना त्यांनी उत्तरेही दिली.

त्यानंतर आपले अंबरनाथ येथील एक सभासद श्री.प्रभाकर विष्णू गोखले यांनी 'सेमी-ऑटोमॅटिक सायकल' विषयक केलेल्या संशोधनाबद्दल (ज्याची माहिती नोव्हेंबर २०१३ च्या 'संवाद' मध्ये छापली आहे) त्यांचा सभेत सत्कार करण्यात आला. श्री.प्रभाकर गोखले यांनी उपस्थितांना आपल्या संशोधनाबद्दल माहिती सांगितली. त्यानंतर श्री.आगरकर यांनी सर्व सभासदांना आवाहन केले कीं, आपापले रिव्हाइज्ड फॅमिली पेन्शन ॲडव्हाइस ब्रँचमधून घेऊन ते सर्व दृष्टीने बरोबर आहेत की नाहीत हे तपासून पहावेत. (उदा. आपल्या पत्नीचे/पतीचे नांव, रिव्हाइज्ड फॅमिली पेन्शनची रक्कम इत्यादी) जर कांही त्यात तृटी असल्यास लगेच पी.पी.जी.डिपार्टमेंटला योग्य माहितीसह अर्ज करून त्यात सुधारणा काय पाहिजे हे कळवावे व सुधारित ॲडव्हाइस मागवून घ्यावा जेणे करून आपल्या पश्चात फॅमिली पेन्शनरला त्रास होणार नाही.

श्री.शशांक वेचलेकर यांनी डोंबिवली येथे अनेक क्रियाशील सभासद असल्याने त्यांच्या कला-गुणांना वाव मिळण्यासाठी ठाणे-अंधेरी येथील सांस्कृतिक मंडळांच्या धर्तीवर एखादे मंडळ स्थापन करावे व वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम सभासदांच्या फायद्यासाठी आयोजित करून त्याची माहिती 'संवाद' मध्ये प्रसिद्ध करावी अशी सूचना केली. त्या संबंधी विचार करण्यासाठी एक बैठक मार्च २०१४ अखेरीस टिळकनगर शाखेत आयोजित करण्याचे ठरले. बैठकीच्या तारखेसाठी व वेळेसाठी पुढील सभासदांशी संपर्क साधावा असे सांगितले. श्री.वेचलेकर - ९८९२२६५५७४; श्री.शेट्टी - ९८१९०७०६८१; श्री.बंगाली - ९९८७०४८९९६; श्री.आगरकर - ९९२०५९७२३१. या सूचनेचे सर्वश्री व्ही.एम.गोखले, एस.बी.गोखले व बाळासाहेब दांडेकरांनी स्वागत करून सुयश चिंतून आवश्यक ते सहकार्य देण्याचे आश्वासनही दिले.

सभेचे सूत्र संचालन बँकेच्या पेन्शन विभागाचे श्री.कुलकर्णी यांनी केले. त्यांनी शेवटी सर्वांचे आभार मानले. विशेषत: नेहमीच्या कामामध्ये श्री.आगरकर करीत असलेल्या मदतीबद्दल त्यांना विशेष धन्यवाद दिले. त्या नंतर चहा-नाश्ता होऊन सभा समाप्त झाली.

**सुभाष आगरकर**
रीजनल ऑर्गनाईझिंग सेक्रेटरी (मुंबई विभाग)

# युनिट वार्ता

## अहमदनगर युनिट :

दि.१९ ऑक्टोबर २०१३ रोजी अहमदनगर युनिटने येथील सदस्य श्री.जयराम थदानी यांचे घराचे गच्चीवर कोजागिरी पौर्णिमेचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमास बँकेच्या अहमदनगरच्या आर.बी.ओ.ऑफिसचे उपमहाप्रबंधक श्री.मोतीलाल पुरोहित व सावेडी शाखेचे शाखाधिकारी श्री.सोमवंशी यांना निमंत्रित करण्यात आले होते. श्री.पुरोहितसाहेबांना नुकतेच डेप्युटी जनरल मॅनेजर म्हणून प्रमोशन मिळाल्याबद्दल त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. त्यानंतर स्थानिक 'आशिर्वाद ग्रुप' यांनी गीत गायनाचा कार्यक्रम सादर केला. त्यांनी सादर केलेल्या भक्तीगीत, नाट्यगीत व नाट्यप्रवेश सादरीकरणास उपस्थित सदस्यांनी भरभरून दाद दिली. कार्यक्रमास ६५ सदस्य उपस्थित होते. श्री.दत्ता धर्माधिकारी यांनी आभार प्रदर्शन केले. अल्पोपहार व दुग्धपानानंतर कार्यक्रम संपन्न झाला, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एस.आर.जोशी, डी.एन.कुलकर्णी, रामभाऊ घोटणकर, जयराम थदानी, श्रीमती टेंभुर्णीकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

दि.१० जानेवारी २०१४ रोजी हुर्डापार्टी आयोजित केली होती. दरमहा पहिल्या बुधवारी भिशी निमित्ताने सदस्यांची भेट होतच असते. पण हुर्डा पार्टीच्या निमित्ताने जास्तीत जास्त सदस्य व सहसदस्य यांनी एकत्र यावे अशा उद्देशाने शहरापासनू जवळच असलेल्या पांजरापोळ येथे हुर्डापार्टीचे आयोजन करण्यात आले होते. जानेवारीतील कोवळे ऊन, गुलाबी थंडी आणि सोबतीला गरमागरम हुर्डा, तसेच रेवडी, गोडीशेव, हरभरा, बोरं, विविध चटण्या व दही इत्यादी पदार्थांचा मनसोक्त आस्वाद सर्वांनी घेतला. यावेळी सदस्यांनी कविता, विनोदी किस्से यांचे सादरीकरण केले. या कार्यक्रमास ५१ जणांची उपस्थिती होती. पार्टी यशस्वी होण्यासाठी जयंत जोशी, रामभाऊ घोटणकर, डी.एन.कुलकर्णी, एस.आर.जोशी यांनी विशेष परिश्रम घेतले.

शिवप्रसाद जोशी
सचिव (अहमदनगर युनिट)

**********

## नांदेड युनिट :

नांदेड युनिटची मासिक सभा रविवार दि.२ फेब्रुवारी २०१४ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती, नांदेड शाखेमध्ये आयोजित केली होती. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी येथील क्षेत्रीय व्यवसाय कार्यालयाचे मुख्य प्रबंधक श्री.ए.के.द्विवेदी हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून कृषी उत्पन्न बाजार समिती, नांदेड शाखेचे मुख्य प्रबंधक श्री.धिरेंद्र बारोट हे होते. तसेच ऑफिसर्स असोसिएशचे रिजनल सेक्रेटरी श्री.चुकेवाड, डेप्युटी सेक्रेटरी श्री.मुखेडकर, स्टाफ युनियनचे रिजनल सेक्रेटरी डॉ.गोविंद गौड व असि.रिजनल सेक्रेटरी श्रीमती विजयालक्ष्मी अय्यर यांची उपस्थिती लाभली होती.

सर्वप्रथम आपल्या युनिटच्या पदाधिकाऱ्यांनी मान्यवर पाहुण्यांचे व असोसिएशन/युनियनच्या पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन हार्दिक स्वागत केले. नांदेड येथील ज्येष्ठ सभासद श्री.मल्हारराव त्रिंबक ऊर्फ अण्णासाहेब देशपांडे यांचा पंचाहत्तरी निमित्त अध्यक्षांचे हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन हृद्य सत्कार करण्यात आला. तसेच युनिटचे नविन सदस्य श्री.चारी यांचेही गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. सर्वश्री बेलोकर,बारोट, चुकेवाड, मुखेडकर, चाकोते, कुलकर्णी, कंचलवार, डॉ.गौड व श्रीमती अय्यर यांनी सत्कारमूर्ती श्री.एम.टी.देशपांडे यांचेबद्दल आपल्या भाषणात गौरवोद्गार काढून त्यांना शुभेच्छा दिल्या. उत्तरादाखल आपल्या भाषणात श्री.देशपांडे यांनी सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त करून सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.द्विवेदी यांनी आपल्या भाषणात श्री.देशपांडे यांना शुभेच्छा दिल्या व असोसिएशनच्या कार्याबद्दल कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्री.रमेश बेलोकर यांनी खुमासदार पद्धतीने केले व श्री.गणेश कुंडकर यांनी आभार प्रदर्शन केले. अल्पोपहारानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वश्री चाकोते, कुलकर्णी, भगवान गायकवाड, नरवाडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

काशिनाथ कांबळे
सेक्रेटरी (नांदेड युनिट)

**********

## सोलापूर युनिट :

दि.२४ जानेवारी २०१४ रोजी बँकेच्या बाळीवेस शाखेत तिळगूळ वाटप व महिलांसाठी हळदी-कुंकू समारंभ आयोजित केला होता. या कार्यक्रमात आपले सर्व सभासद/सहसभासद, सोलापूर येथील सर्व शाखांचे कर्मचारी/महिला, तसेच रिजनल ऑफिसचे अधिकारी व कर्मचारी असे सर्व मिळून जवळजवळ २०० जण सहभागी झाले होते. सर्वांना मसाला दूध व नॅपकीन भेट म्हणून देण्यात आले. हा प्रेमळ सोहळा घडवून आणण्यासाठी श्रीमती कासट, सौ.देशपांडे, सौ.मंगला कांबळे, सौ.हल्लूर, श्रीमती कुंभारे, श्रीमती ताम्हणे व श्री.अनगळ यांनी विशेष परिश्रम घेतले. नववर्षाच्या शुभेच्छा देऊन कार्यक्रम संपन्न झाला.

तम्मा पाटील
सेक्रेटरी (सोलापूर युनिट)

**********

## जळगाव युनिट :

दि.२६ जानेवारी २०१४ रोजी आपले जळगाव युनिट व बँकेची जळगाव मुख्य शाखा यांचे संयुक्त विद्यमाने निवृत्त कर्मचाऱ्यांचा 'स्नेह मेळावा' मेहरूण जवळील शिवाजी उद्यानात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. मेळाव्यास सभासद/सहसभासद मिळून जवळजवळ १५० जण उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून जळगाव मुख्य शाखेचे सहाय्यक महाप्रबंधक

श्री.श्रीकांत धोंडसाहेब, बँकेच्या जळगाव क्षेत्रीय व्यवसाय कार्यालयातील उपव्यवस्थापक श्री.अतुल सावजी, तसेच आपल्या असोसिएशनच्या औरंगाबाद झोनल सब्-सेंटरचे सेक्रेटरी श्री.नागेश जोशी, श्री.राऊत, श्री.एस.बी.कुलकर्णी ह्यांची उपस्थिती होती. विशेष निमंत्रित म्हणून 'आशा फाउंडेशनचे' संचालक श्री.गिरीश कुळकर्णी यांची उपस्थिती लाभली होती.

यावेळी श्री.भागवत पाटील यांच्या कलावृंदाचा सुगम संगीताचा तसेच प्रजासत्ताक दिनानिमित्त देशभक्तिपर गीत गायनाचा बहारदार कार्यक्रम झाला. त्यानंतर आशा फाउंडेशनचे' संचालक श्री.गिरीश कुळकर्णी यांचे 'आनंदी जीवन जगू या' ह्या विषयावर उद्‌बोधक भाषण झाले. त्यानंतर सहा.महाप्रबंधक श्री.धोंड साहेबांचे मार्गदर्शनपर भाषण झाले. त्यानंतर श्री.नागेश जोशी यांनी निवृत्त कर्मचाऱ्यांसाठीच्या मेडिकल बेनिफिट स्कीमबद्दल व बँकेच्या डिस्पेन्सरीज विषयी माहिती सांगून त्याविषयी सभासदांना येणाऱ्या अडचणी व बँकेचे त्याबाबतचे धोरण यावर चर्चा करून मार्गदर्शन केले. सभेच्या सुरुवातीला नाश्ता/चहा व दुपारच्या जेवणाचा सर्वांनी आस्वाद घेतला. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. ह्या मेळाव्याचे यशस्वी आयोजनात सर्वश्री एस.एम.पाटील (युनिट अध्यक्ष), व्ही.आर.बाविस्कर (सेक्रेटरी), आर.के.पाटील (खजिनदार), एस.बी.पाटील, उदय नारखेडे, बी.एस.डांगे व चंद्रकांत आंबेकर यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

व्ही. आर. बाविस्कर
सेक्रेटरी (जळगाव युनिट)

**********

## पुणे युनिट :

दि.२३ जानेवारी २०१४ रोजी पुणे येथिल हिंगणे(खुर्द) शाखेत सायं.४ ते ६ यावेळेत 'पेन्शनर्स मेळावा' आयोजित केला होता. असोसिएशनतर्फे पुणे झोनल सब्-सेंटरचे अध्यक्ष श्री.एल.जी.गांधी, उपाध्यक्ष श्री.व्ही.एन.कुलकर्णी, सेक्रेटरी श्री.चंद्रकांत कुलकर्णी व जॉइंट सेक्रेटरी श्री.अशोक पंडित हे या मेळाव्यास हजर होते. सभासद व सहसभासद मिळून ४५ जण हजर होते. महिला वर्गासाठी हळदी-कुंकू समारंभ व सर्वांना तिळगुळ वाटप झाल्यावर शाखाधिकारी श्रीमती बापट यांनी सर्वांचे स्वागत केले. आपल्या भाषणात त्यांनी सांगितले कीं, सर्वांनी आपले बँकेचे बहुतांश व्यवहार इंटरनेट द्वारे केल्यास बँकेतील गर्दीमुळे होणारी गैरसोय टाळता येऊ शकेल. ज्यांना इंटरनेट वापरणे माहित नसेल अशांसाठी बँकेत कोचिंग दिले जाणार आहे. त्याचा इच्छुकांनी लाभ घ्यावा. उपस्थित बहुतांश सभासदांनी ब्रँचमधील कर्मचारी वर्गाच्या सेवाभावी वृत्तीवर समाधान व्यक्त केले. आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रम संपन्न झाला.

अशोक पंडित
सह सचिव (पुणे झोनल सब्-सेंटर)

## अभिनंदनीय

आपल्या खामगांव युनिटच्या सदस्या सौ.सुचेता धनंजय हातेकर या दी खामगांव अर्बन को-ऑप. बँकेच्या संचालकपदी बहुमताने निवडून आल्या त्याबद्दल त्यांचे असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन. सामाजिक कार्याची बांधिलकी असलेल्या सौ.हातेकर यांना लेखनाची आवड असल्याने त्यांचे लेखन अनेक ठिकाणी प्रसिद्ध झालेले असून त्या विदर्भ साहित्य संघ, खामगांव शाखेच्या कार्यकारिणी सदस्य आहेत. त्यांना आपल्या 'संवाद' मासिकामार्फत घेतल्या जाणाऱ्या लेख स्पर्धेत २००९ साली 'स्त्री' विभागात प्रथम पुरस्कारही मिळाला आहे. तसेच विद्या भारती प्रणित श्री.सरस्वती विद्या मंदिरच्या त्या संचालिका आहेत. अशा या बहुआयामी व्यक्तिमत्वाचा सत्कार खामगांव युनिटतर्फे नुकताच करण्यात आला. त्यावेळी श्री.व सौ.हातेकर यांनी असोसिएशनला रु.१०००/- ची देणगी दिली. याबद्दल त्यांचे असोसिएशनतर्फे आभार व पुढील यशस्वी वाटचालीबद्दल शुभेच्छा.

- सेक्रेटरी

## Attention All Members

It is advised by the Bank as under :

**"Bank has decided to withdraw staff benefits to S/B A/Cs of Staff/Pensioners/ Family Pensioners/PF Optees etc. in which valid PF Index Numbers are not 'linked' with effect from 01/02/2014. We, therefore, request to spread this message among the pensioners / family pensioners and PF Optees to verify the status of their pension S/B A/cs from the pension paying branches and arrange for linking their valid PF Index numbers to the accounts immediately."**

All the members are, therefore, requested to go to the Bank and check whether their Prov. Fund Index number is 'linked' to their accounts. If not, then request the Branch Manager/concerned authorised official to do so. These instructions were already in vogue and it is possible that your pension and other accounts are already linked to their Prov. Fund Index number. But as a precautionary measure all are requested to verify the position at an early date.

**- Secretary**

## सर्व सभासदांसाठी अत्यंत महत्वाचे

बँकेने असे कळविले आहे कीं, दि.१ फेब्रुवारी २०१४ पासून जी स्टाफची/पेन्शनर्सची खाती त्यांच्या प्रॉव्हिडंट फंड इंडेक्स नंबरशी जोडली नसतील (लिंक केली नसतील) तर अशा सर्व स्टाफ डिपॉझिट खात्यांवर 'स्टाफ व्याज दर' मिळणार नाही. तरी सर्व सभासदांना विनंती की, त्यांनी बँकेत जाऊन खात्री करून घ्यावी की त्यांची सर्व स्टाफ खाती, ज्यावर त्यांना आतापर्यंत स्टाफ व्याज दर मिळत होता, ती सर्व खाती त्यांच्या प्रॉव्हिडंट फंड इंडेक्स नंबरशी जोडली आहेत. जर नसतील तर शाखाधिकाऱ्यांना सांगून ती खाती प्रॉव्हिडंट फंड इंडेक्स नंबरशी 'लिंक' करून घ्यावीत. ही माहिती आपल्या सर्व पेन्शनर मित्रांपर्यंत पोहोचवावी जेणे करून ते या सुविधेपासून वंचित रहाणार नाहीत.

**- सेक्रेटरी**

## *विनोद*

नंदू : काय चंद्या आज चेहरा का पडलाय!
पुन्हा वहिनींशी भांडण झालं वाटतं.

चंदू : होय रे! हल्ली रोजच भांडणं होत असतात.

नंदू : अरे पण तुमचा प्रेम विवाह झालेला आहे ना?

चंदू : हो रे ! पण तो गैरसमजातून झाला.

नंदू : तो कसा काय?

चंदू : माझा गैरसमज झाला होता की तिचे माझ्यावर खूप खूप प्रेम आहे.

नंदू : मग नाहीये का?

चंदू : नाही ना! तिचा गैरसमज झाला की माझे जवळ भरपूर पैसा आहे.

नंदू : अरे देवा! असं झालं का?

(वरील विनोद पागल अन्सारी यांच्या एका उर्दू शेर वरून तयार केला आहे.)

तो शेर असा -

मैं समझता था, उन्हे मुझसे मोहब्बत होगी
वो समझते थे, मेरी जेब में पैसा होगा ॥

- **वसंत धुपकर**, पुणे
- ०२० - २०२५५४०८

## *अभिनंदनीय*

नागपूर येथील एक सभासद श्री प्रकाश खांडेकर यांची कन्या कु. निवेदिता हिला 'प्रिंट मिडीया पर्यावरण रिपोर्टिंगसाठी' असलेले राष्ट्रीय स्तरावरील प्रथम पारितोषिक मिळालं आहे. त्यामुळे तिला 'यू कॅन चेंज क्लायमेट' पोलंड येथे भरणाऱ्या परिषदेत भाग घेण्याची संधी प्राप्त झाली आहे. दिल्ली येथे तिला यासाठीच रू. ५०,०००/- चे पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. कु. निवेदिताच्या या उज्ज्वल यशाबद्दल असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन

* * * * * *

नागपूर येथील सभासद श्री. सदानंद रामचंद्र पंचवटीकर यांचा नातू चि. रथीन सभासद हा N.C.O.(नॅशनल साइबर ऑलिम्पियाड) ह्या आंतरराष्ट्रीय परीक्षेत नागपूर शहरातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला. त्याबद्दल त्याला गोल्ड मेडलने सन्मानित करण्यात आले.

मागील वर्षी I.M.O. (इंटरनॅशनल Maths ऑलिम्पियाड) ह्या आंतरराष्ट्रीय परिक्षेत नागपूर शहरातून द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल त्याला सिलव्हर मेडलने सन्मानित करण्यात आले होते.

चि. रथीनला पुढील शिक्षणाकरिता असोसिएशनतर्फे शुभेच्छा!

* * * * * *

नागपूर येथील सभासद श्री. श्रीकांत भुस्कुटे हे उत्तम पियानो-ॲकार्डीयन वाजवितात. नागपूर येथील ''सुरसंगम'' ह्या वाद्यवृंदातून त्यांनी वादन केलेले आहे. तसेच १९६९ मध्ये त्यांनी स्व. किशोर कुमार यांना त्यांच्या नागपूर आणि रायपूर येथील कार्यक्रमातून साथ केलेली आहे. जुन्या हिंदी-मराठी गीतांची ते कि-बोर्ड वर साथही करतात. श्री भुस्कुटे यांना त्यांच्या पुढील वाटचालीस असोसिएशनतर्फे हार्दिक शुभेच्छा

सामाजिक संस्थांसाठी विनामूल्य कार्यक्रमासाठी
संपर्क- फोन. २२३०६३३ , मो. ९९२३७३७३७०

* * * * * *

अमरावती येथील सभासद श्री. त्र्यंबक रामभाऊ माकोडे यांचे चिरंजीव श्री. श्रीधर हे सॉफ्टवेअर इंजिनियर असून ते सिनीअर सॉफ्टवेअर इंजिनीयर म्हणून T.C.S. (Tata consultancy services) कार्यरत होते. त्यांच्या कठोर श्रमामुळे company ने त्यांना पदोन्नती देऊन पेरू (दक्षिण अमेरिका) येथे Project Team Leader म्हणून निवड केली.

या सुयशाबद्दल असोसिएशनतर्फे अभिनंदन

**- सेक्रेटरी**

## VOLUNTEERING

Every one of us knows about life after retirement. We have experienced it. For some time we enjoy the leisure life, extra sleep after lunch (some call it power nap or afternoon siesta!), entertainment and all such things. One day or the other we are bound to get bored with such monotony more so because we are used to hectic activities like travelling, meeting people and discussing various matters sharing joys and sorrows of our colleagues, friends, relatives and even of our customers. In fact, to be honest, at the back of our mind we enjoyed and derived great deal of pleasures in doing so even though we called it monotonous sometimes. Various pressures, tensions etc. while in service, were inseparable part of our lives for more than 3 decades. So our idea of not doing anything after retirement and enjoy the leisure and extra sleep as said above, is most likely to fade in thin air as we find it boring sooner than later. This inaction leads to frustration. Then we search for some scapegoat. Generally our spouse (who else will be a willing and handy target!). We start arguing on non-issues and fight ensues. People around start wondering - 'what has happened to a nice, loving and caring guy? How come he has changed so much after retirement? He used to be concerned so much for his family when he was working'. We also know in our mind that we are not doing right. The main reason behind all this is, 'idle mind is devil's workshop.' Such situations were experienced more in case of those who opted for V.R.S. mainly because they had still lot of banking in them (term not mine but borrowed from out form sportsmen mostly cricketeers) and as such were not ready to cap their pens (again from sportsmen who say 'hanging of shoes') face the sudden vacuum created by no 'work and all leisure situations'. As per the latest study by the American College of Cardiology, ' Be physically active. Even 30 minutes of moderate-intensity activity five times a week reduces the risk of heart disease and stroke. Alternatively, any bodily movement that uses energy helps.' The best therapy, for this 'ailment', (can we say VIRUS!) according to me is to start searching for something which will keep us occupied.

I am going to tell you one source for keeping us occupied in a constructive way and that is VOLUNTEERING. Volunteering means offering one's services and time free of charge to those who need it most. There are many social organizations where you can find outlet for your creativity. One such organization where I found satisfaction is SOSVA (Society for Service to Voluntary Agencies) founded in 1984 by Magsaysay awardees like late Dr. Banoo Coyaji, Dr. Rajnikant Arole and some other eminent personalities and governed by a team of retired civil servants. In 1997 VOLACT (Centre for Promoting Voluntary Action) one of the projects of SOSVA was set up in Mumbai, to meet the needs of people who wished to volunteer their time and talents but did not know how and where to find NGOs who needed these volunteers. STAPI (*SOSVA Training & Promotion Institute*) - another brain child of SOSVA - at Pune has promoted and strengthened more than 500 NGOs.

We have worked enough for money because that is our duty to our family. Now it is time to give back to society what we got from it, and experience the joy of giving. SOSVA is in constant contact of various NGOs from various sectors like health, education, differently able, environment, community development etc. The volunteers also come from different walks of life; like students, housewives, retirees, professionals, corporate employees, government staff, foreign nationals etc.

When you approach SOSVA, they will enquire about your ability, liking and all such relevant information to find a right activity for you. They will also ascertain from you the time of the day you will be able to devote for the activity. They might ask you the place which you can visit conveniently so that you will not have to stretch your schedule beyond limits. (This takes care of your desire for extra sleep and leisure post retirement.) Then they will tell you opportunities available at that time with them and

suggest you one which would suit you in all respects including proximity to your residence so as to keep travelling as less as possible. With their help I have joined YMCA Boys Home at Andheri (w) to teach the poor students English and Maths and some other subjects since last 6 yrs. I really feel satisfied that I could get associated with a noble profession and I feel that I am gaining more than those boys by way of satisfaction. In my present dry life I am finding myself again amongst loving children. The love and satisfaction you get cannot be measured in money terms.

To sum up activities taken up by some of the volunteers are - teaching swimming to special children, puppet making, yoga, computer training, arts and crafts, conversational English to children, initiating underprivileged children to education, regular reading for the blind at their home, spending time with cancer patients/ children to entertain them etc. I am sure those of you who try this route will never repent but feel happy about it. Their addresses are as under -

**SOSVA, Mumbai**
Room no. 2 & 3 Petit Municipal School
Opp. Bhabha Hospital R.K.Patkar Marg
Bandra (w) Mumbai 400050
Ph : (022) 26403490, 26555704

**STAPI, Pune**
Mhada Commercial Complex
M.H.B.Colony Yeravada
Pune 411006
Ph.: (020) 26695646; 26696212

I wish you God speed in your endeavor.

***- Ashok D. Parab, Mumbai***
Mobile : 09920080633

**********************************************************************************

*SPECIAL FESTIVAL OFFER,*

**FOR ALL YOUR INTERNATIONAL COURIER NEEDS**

***Universal Courier***

*We bring the universe at your doorstep*

*SINCE 1992*

*IATA CERTIFIED*

***An Organization run by SBI pensioners***

***Mr. J. N. Sethia & Mr. P. W. Kamerkar's next generation***

**Offering wide range of services for worldwide such as Express Courier, Airfreight Door to Door as well as Airport to Airport, Import/ Export custom clearance & free pick-ups from anywhere in Mumbai. Expertise in dealing with Foodstuff & personal effect shipments for worldwide.**

*Specialize for: UK, Dubai, USA, CANADA, and AUSTRALIA & AFRICA.*

***Contact: Mr.Biren Sethia - 9820338233, Mr.Mahesh Kamerkar - 9820316152, Pushpendra Tiwari -9870198118/9321026630 & Kajal - 8879140670***

**Landline: 022 - 26821072/74**

E-mail: sales@ucglobal.com & mahesh.k@ucglobal.com

Website: www.ucglobal.com

***HO:** 1 & 2 Skylark, Next to Kamgar Kalyan Bhawan, Near BMC office, Azad Road, Andheri East, Mumbai – 400069*

## TELL ME A STORY

"Tell me a story"! These words have been ringing in my ears for well over 25 years. My daughter would demand a story while bathing, eating and of course at bed time with these words. All of us grew up listening stories from our grandparents. Those of us who grew in Mumbai's (I mean Bombay) chawl culture might have listened to them from some old aaji or aajoba staying next door. All children would gather around them in the evening to coax them to tell the stories. Since we were a nuclear family I had to fulfil my daughter's demand.

From time immemorial story telling has been one of the oldest modes of entertainment for all age groups. The story tellers provided entertainment as also imparted values of life to the listeners more to children. Vishnusharma converted ignorant princes into able rulers through his stories which became eternal by name panchatantra. Aesops fables is a treasure of knowledge and principles of life. Arabian nights or Alif Laila are entertaining and also the stories narrated by a princess in such a way that she could save lives of other girls who otherwise would have been killed by a sultan. We also know how Hans Anderson squandered all his wealth inherited from his parents and then out of repentance resorted to storytelling to become Europe's best story teller of all times. So this is an exclusive art which transports the listeners to a different world of his or her imagination.

This feature adds a special aura and charm to its content as it fulfils the aspirations and dreams of the listeners as they start identifying themselves with the characters in the story. Really speaking story telling has not vanished. As technology advanced storytelling changed its form. Now story telling has been translated into visual forms and presented on T V or Websites or Films. So basically it is one way transmission and with no scope for interaction. The personal touch which made a story lively is lost in oblivion. Prior to invasion of TVs and other multimedia tools, listening to stories was the sole means of time pass for children, youngsters and even to elders. People would voluntarily assemble in groups. The sessions would be lively due to direct interaction between the narrator and his audience. The listeners, mainly children got inspiration and inculcated values of bravery, courage, truth, kindness, charity, ambition etc. They would mature into great personalities leading people and nations. This is apparent from biographies of some great personalities.

Storytelling has always been a profession. Take the case of our Kirtans and pravachans. The preachers usually narrate stories from Bhaagwat and /or other scriptures to stress their point of view. (All our scriptures contain a huge wealth of knowledge conveyed through stories).

Mass media like TV has a great advantage to reach out to a bigger audience as almost every family has access to this gadget. So TV serials based on stories from epics like Ramayana, Mahabharat or Bhagwat can reach the remotest corners of the world. Videos with English subtitles can be viewed by non Indian audiences, thereby spreading our culture and values abroad also. Similarly we can also have access to their culture through videos produced by them. These stories can also be stored on the computer and viewed according to each ones convenience. Stories narrated through visual scenes have a better impact on the mind and are not easily forgotten.

There is another aspect to storytelling through multimedia having an edge in the present is that reading habits of the new generation are slowly fading. When the youngsters and even the middleaged are used to only computer literature, stories narrated on the screen can entertain and educate them. Lives of great leaders, saints prophets who during their times inspired their generation to grow mentally and spiritually can be depicted by some significant Instances from their lives through versatile actors

.For e.g. the life history of Swami Vivekananda or Abraham Lincoln if produced as a feature film with popular stars and soulful music could leave an indelible mark on sensitive minds, perhaps help them somewhere in facing their personal problems or even change their thinking pattern.

Present generation of parents have to work under various constraints arising out of stiff socioeconomic conditions, career progression etc. It is sad that they are unable to devote as much time for children as they should. A sapling can survive and grow if its roots are firm and is well nurtured. A young mind too has to grow and it is necessary to instil the right values when it is tender. Teachers and parents play a very significant role in shaping their thoughts. Schools should make story telling from great epics a part of the curriculum. I do remember that in our school there was a teacher who loved to tell stories during free period and she was very popular amongst us. Parents can narrate stories of their childhood and different experiences at the dinner table and open new windows in their imagination, at least once a week. This practice would bring them closer to each other, nurture in their tender minds values of caring and sharing, and also enrich their childhood memories.

Each one of us has a story to tell and we are equally anxious to hear others' story. So let's make a special effort to sow the seed of curiosity in tender minds whenever we have the opportunity. I read in papers recently that people have formed 'storytelling' clubs in Mumbai and in other cities. This is really a very good attempt to revive the art of storytelling.

We the pensioners can do a lot in this direction for family as also for society.

***- Manjeeta Deshmukh. Mumbai***
Mobile : 09920839856.

****************************************************

६ वा स्मृति दिन (पुण्य स्मरण)
९ फेब्रुवारी २०१४
स्व. सॅमसन साहेब



7-1-1916 V 7-2-2007
H$m`j_ hS› H${eAa, nU H$n enIm
निराधारांना देई आधार
निरक्षरांना करी साक्षर
सेवा ही असे अक्षर
पहावा त्यामध्ये ईश्वर
सॅमसन साहेब प्रेमी मंडळींचे त्यांच्या
स्मृतिस अभिवादन

ONLY FOR SENIOR CITIZENS
JUST FOR RELAXATION
COMFORTABALE HOME STAY @ ALIBAG
Aashiyana Resort
3 NIGHTS 4 DAYS
EVERY MONDAY CHECK IN & THURSDAY CHECK OUT
RS:-2000/-PER PERSON
INCLUDING** STAY+BREAKFAST + LUNCH & DINNER
CALL: RAJESH RANADE
9223434354- 9223273496
Post Akashi-Alibag-Murud Rd-Near Amit Beer Shoppy

ललित

# संवाद साहित्य सम्मेलन

सांप्रत महाराष्ट्र देशी सम्मेलनांना ऊत आलेला आहे. मराठी साहित्य सम्मेलन, नाट्य सम्मेलन, कवि सम्मेलन, ग़ज़ल सम्मेलन इ. इ.

दहा वर्षांपूर्वी आपल्या असोसिएशनने सभासदांसाठी 'संवाद' गृहपत्रिका सुरू केली. १६ किंवा २४ पृष्ठांचे हे मासिक, निवृत्त सभासदांच्या संपर्कासाठी सुरू केले. अधिकृत परिपत्रकाव्यतिरिक्त उरलेल्या पानांवर सभासदांचे स्वरचित साहित्य प्रसिद्ध करावे असे ठरले. वाचन-लेखन करणाऱ्या सभासदांना ही सुवर्णसंधीच प्राप्त झाली व साहित्यिक सभासदांनी याचा पुरेपूर लाभ घेतला, व घेत आहेत. सभासदांचे लेख, कथा, कविता, विनोद, चुटके, चारोळ्या, व्यंगचित्रे यांचा ओघ 'संवाद' कडे सुरू झाला. त्यातून निवड करण्यासाठी संपादक मंडळ अस्तित्वात आले. 'संवाद' पुण्यातून प्रसिद्ध होत असल्याने कामाच्या सोयीसाठी पुणेस्थित संपादक निवडले गेले. (असेही पुणे हे विद्वानांचे शहर म्हणून ओळखले जातेच! असो.)

गेल्या दहा वर्षात भरपूर साहित्य प्रसिद्ध झाले व अनेक साहित्यिक सभासद, प्रसिद्धीस पावले, त्यांचे साहित्य बहरले, फुलले, काहींचे साहित्य नंतर पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाले. अशा पुस्तकांची परीक्षणे देखील 'संवाद'ने वेळोवेळी प्रसिद्ध केलेली आहेत.

या सर्व साहित्यिक सभासदांचे 'संवाद' साहित्य सम्मेलन भरवावे कां? असा विचार माझ्या मनात आला. त्या दृष्टीने मी सर्व साहित्यिक सभासद मित्रांना पत्ररूपाने विचारणा केली (काल्पनिकच!) त्यांची मते / सूचना मागविली. अनेकांनी ह्या कल्पनेचे स्वागत केले, काही सूचना / मागण्या पत्रातून मांडल्या. काही मुलभूत मुद्दे उपस्थित केले. (हेही सर्व काल्पनिकच आहेत) आलेल्या पत्रांवरून माझा खूप गोंधळ उडाला. तो गोंधळ असा........

सम्मेलन स्थळावरून मतभेद दिसून आले. मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, कोल्हापूर कि नागपूर औरंगाबाद? विदर्भ मराठवाड्यावर सर्वच थरातून अन्याय होत आहे. प्रत्येक वेळी पुणे मुंबईच कां?

सम्मेलन अध्यक्ष कोण असावा? तो निवडणूक घेऊन निवडावा, कि कुणा एकाची सन्मानाने निवड करावी, कि ज्येष्ठतेनुसार, कि सम्मेलनाला जास्तीत जास्त आर्थिक सहाय्य करणाऱ्याची निवड करावी.

सम्मेलन ज्या मंडपात किंवा हॉलमध्ये भरविणार त्याला कुणाचे नाव द्यावे?

सम्मेलन किती दिवसांचे असावे, एक, दोन कि तीन सम्मेलनात कथा वाचन, कविता, लेख वाचन, यासाठी किती वेळ द्यायचा, याचा निर्णय होईना, कारण साहित्यिक सभासदांनी पत्रातून त्यांच्या इच्छा, मागण्या मांडल्या होत्या. त्यातल्या काही निवडक पत्रांचा उल्लेख करावासा वाटतो.

पुण्याचे श्री. सुहास बोकील यांनी त्यांचे 'अत्रे प्रदर्शन' सम्मेलनात मांडण्याची इच्छा व्यक्त केली. आ. अत्रे म्हणजे मराठी साहित्यिकांचा बाप होता असे त्यांचे मत आहे.

'संवाद'चे व्यंगचित्रकार श्री. मधुकर पालकर पुणे व वसंत करंबेळकर रत्नागिरी यांनी त्यांची आतापर्यंत प्रसिद्ध झालेली सर्व व्यंगचित्रे (enlarge) करून सम्मेलनात ठळक पणे मांडावी असे सुचविले - व्यंगचित्रे म्हणजे विनोद व चित्रकला यांचा सुरेख संगम असतो असे ते म्हणतात.

श्री. अशोक बुटाला मुंबई अरूण भट, बदलापूर पु. नि. देशपांडे अमरावती, गोपाळ मुळे अहमदनगर, भरत जैन व मधु रानडे नाशिक या सर्वांनी कमीत कमी १० ते १५ विनोद-चुटके सम्मेलनात सादर करण्याची मागणी केली आहे. जे साहित्य लोकांना हसविते तेच खरे साहित्य अशी त्यांची ठाम समजूत दिसून आली.

साहित्याला भाषेचे बंधन नसावे आम्ही इंग्रजीतून लिहितो, ते आम्ही सभासद म्हणून 'संवाद'मध्ये प्रसिद्ध होते. तेच आम्हाला सम्मेलनात सादर करू द्यावे असे मिस्टर बेंजामिन बोरीवली, एस. व्ही. नाईक मुंबई, व राजीव प्रसाद पुणे यांनी इंग्रजीत पत्र पाठवून कळविले. 'english is international language' याची संयोजकांनी जाण ठेवावी असे त्यांचे मत पडले.

वरील प्रमाणेच हिंदी-उर्दूतून कविता-शायरी करणारे श्री. बद्रुद्दिन काझी धुळे, गुलाब शेख सातारा, व चंद्र वझिरानी नागपूर यांनीही दावा केला व 'राष्ट्रभाषा हिंदीचा योग्य तो मान सम्मेलनात ठेवावा अशी विनंतीवजा आज्ञा केली.'

काही सभासद अविरत लेखन करीत असतात. त्यांना 'संवाद'ची पाने अपुरी पडत असल्याने त्यांनी पुस्तक रुपाने त्यांचे साहित्य प्रसिद्ध केले आहे. त्यांनी त्यांचे एखादे तरी पुस्तक सम्मेलनात पूर्ण वाचण्याची परवानगी मार्गातली आहे. त्यात प्रामुख्याने मधु पोतदार पुणे, संपदा वागळे ठाणे, मुकुंद सराफ विलेपार्ले हे होत.

लघुकथा लिहिणाऱ्या लेखिकांनी त्यांची लघुतम अशी कथा वाचण्याची इच्छा व्यक्त केली आहे त्यात इना तळपदे बॅंगलोर, कार्तिकी काळे बोरीवली, व वनिता आपटे कराड यांचा समावेश आहे.

'संवाद' साहित्यातील सर्वांत लोकप्रिय प्रकार म्हणजे कविता लेखन. बँकेतून निवृत्ती मिळाली. हुश:! मन कसे Tension मुक्त झाले. मनाला प्रतिभेचे पंख फुटले. रिकाम्या वेळेमुळे वाचन वाढले. तारूण्यातील गो ऽ ड गो ऽ ड आठवणी जागृत झाल्या आणि कविता बहरु लागल्या. विशेषत: पावसाळा सुरू झाला की 'संवाद'कडे पावसाळी कवितांचा पूर येतो. आषाढात पंढरीची वारी सुरू झाली की सभासदांच्या कवितेतून भक्तिरस पाझरू लागतो. गणेशोत्सवात गणेशाच्या प्रार्थनारूपी कवितांचा ओघ सुरू होतो. या सगळ्या प्रासंगिक कविता

असतात त्यात तोच तोच कृत्रिमपणा येतो. अश्या कवितामधून निवड करतांना संपादकांच्या नाकी नऊ येतात.

साहित्य सम्मेलनाचा कवि सम्मेलन हा अविभाज्य भाग असतो. त्यामुळे सर्व कविंना संधी दिली तर कमीत कमी दोन दिवस तरी नुसते कवि सम्मेलनच चालेल. म्हणून प्रत्येकी एकच कविता तीही चार कडवी किंवा सोळा ओळींची, त्यापेक्षा दीर्घ नको, असे ठरविले. त्याला काहींनी होकार दिला तर काहींनी तीव्र नाराजी व्यक्त केली. सर्वच कविंच्या पत्रांची दखल घेणे शक्य नसल्याने काहींची प्रतिक्रिया नोंदवितो. होकार देणारे कवि श्री. रमेश इंगोलीकर अमरावती, भरत जैन नाशिक, प्रभाकर कानिटकर कोल्हापूर, मदनलाल काबरा जळगांव, नी. व. ओढेकर नाशिक, गजानन आराणके पुणे, सुरेश जैन औरंगाबाद, अरुण सावरकर कांदिवली.

काही कवयित्रींनी त्यांना वेगळा जास्तीचा वेळ द्यावा, पुरुष सभासद एक कविता सादर करणार असतील तर आम्हाला दोन कविता सादर करू द्याव्यात व वर्षानुवर्षे स्त्री वर्गावर होणारा अन्याय दूर करावा अशी मागणी केली आहे. त्यात प्रामुख्याने संध्या परदेशी औरंगाबाद, शरयु कुळकर्णी कोल्हापूर, कल्पना कोठारी सांताक्रुझ यांचा समावेश आहे.

सांगली येथील कवि श्री. गोविंद करमरकर यांनी कळविले की माझी काव्य-प्रतिभा ४ कडव्यात किंवा १६ ओळीत बंदिस्त करणे योग्य नव्हे. मला कविता वाचता वाचता नवीन कडवे सुचू शकते, किंवा आहे त्या ओळीत बदल करावासा वाटतो. तशी मला **special** परवानगी असावी. काही कवी-कवयित्री सभासदांनी एढ्या कविता प्रसविल्या की त्यांना 'संवाद'चे व्यासपीठ अपुरे वाटू लागले. त्यांनी त्यांचे स्वतंत्र काव्य-संग्रह प्रसिद्ध केले. त्यांनी कमीत कमी एक कविता संग्रह पूर्ण वाचू द्यावा अशी आग्रहाची विनंती केली आहे. त्यात श्री. पुंडलीक भेंडे यवतमाळ, दिलीप रेडकर गोरेगांव, आर.जी. कडवेकर सातारा व सौ. उज्वल ब्रम्हांडकर विरार यांचा समावेश आहे. यापैकी काहींनी जर अशी परवानगी मिळाली तर त्यांचा काव्य संग्रह सवलतीच्या किमतीत उपस्थितांना देण्यात येईल अशी लालूच दाखविली आहे.

लोकप्रिय कविता व गीतांचे विडंबन हा काव्य प्रकार आ. अत्रे यांनी 'झेंडूची फुले' फुलवून लोकप्रिय केलेला आहे. त्यांचाच वारसा आम्ही चालवीत आहोत तर आम्हालाही दोन दोन विडंबन काव्ये सादर करण्याची संधी मिळावी असे श्री. मधु पोतदार पुणे, व्ही. व्ही. देशपांडे सोलापूर, उज्वला कुलकर्णी, चंद्रशेखर निरंतर पुणे यांनी कळविले आहे. 'इतर कविंच्या गंभीर कवितांमध्ये आमच्या हास्य-कारंजी उडविणाऱ्या कविता निश्चितच उपस्थितांना आवडतील आनंद देतील अशी आशा ही त्यांनी व्यक्त केली आहे.'

काही गंभीरपणे जीवनाचा विचार करणारे सभासद कथा, कविता, विनोद, चारोळ्या यांच्या वाटेला न जाता, विविध विषयांवर लेख वा निबंध लिहून पाठवितात. त्यांनी त्यांचे लेख वाचावे कि न वाचावे अशी गंभीरपणे विचारणा केली आहे. समाजाला मार्गदर्शन फक्त वैचारिक साहित्यच करू शकते, दिशा दाखवू शकते अशी त्यांची बौद्धिक धारणा आहे. त्यात प्रामुख्याने मंगला नातू दहिसर, शामराव पोटे अंधेरी, अरविंद पुजारी व शशीकांत लावणीस सोलापूर, अरुण तुळजापुरकर पुणे, बी. के. कुलकर्णी अहमदनगर, संपदा वागळे ठाणे, वाल्मीक कापडे मालेगाव यांचा समावेश आहे.

पुणे येथील गणेश गुर्जर यांचा ज्योतिष शास्त्रावर उत्तम अभ्यास आहे. त्यांना ज्योतिष या विषयावर प्रबंध वाचायची इच्छा होती. परंतु त्यांचे असे मत आहे की 'संवाद' साहित्य सम्मेलन भरविण्याची कल्पना कितीही रम्य असली तरीही, सध्याचे ग्रहमान त्यास अनुकूल नाही व येणाऱ्या २/३ वर्षातही असे सम्मेलन होणे शक्य नाही. तेव्हा तूर्त संयोजकांनी सम्मेलनाच्या नादी लागून, नसते वाद ओढवून घेऊ नयेत व आपले ब्रीद 'वाद नको, संवाद हवा' हे कायम ठेवावे.

ज्योतिष शास्त्र हे एक थोतांड आहे असे अनेकांचे मत असूनही काही प्रत्यक्ष अप्रत्यक्ष अडचणींमुळे असे सम्मेलन भरविणे नजिकच्या काळात तरी शक्य नाही असे वाटल्याने सध्या तरी असा काही विचार नाही याची संवाद साहित्यिकांनी नोंद घ्यावी ही विनंती क्षमस्वी!

(हा संपूर्ण लेख काल्पनिक असून तो एक गंमत म्हणून वाचून सोडून द्यावा! संवाद साहित्यिकांची नांवे मात्र खरी आहेत त्यांनी संवादला दिलेल्या योगदानाचे कौतुक व अभिनंदन!)

- श्री. वसंत धुपकर, पुणे

०७३/१३ भ्रमणध्वनी - ०२०-२०२५५४०८

* * * * * *

## अभिनंदनीय

श्रीरामपूर येथील सभासद श्री. बी. पी. शेजूळ जाने २००६ मध्ये सेवानिवृत्त झाले. नोकरीत असताना त्यांनी LLB ची दोन वर्षे पूर्ण केलेली होती. परंतु ऑफिसर झाल्यानंतर त्यांना LLB पूर्ण करता आले नाही. ती अतृप्त इच्छा त्यांनी सेवानिवृत्त झाल्यावर पूर्ण केली. ऑक्टो. २०१२ मध्ये त्यांनी वयाच्या ६५ व्या वर्षी LLB पूर्ण केले व आता श्रीरामपूर कोर्टात त्यांनी वकीली व्यवसायास सुरुवात केली आहे. निवृत्तीनंतर काय? हा प्रश्न त्यांनी स्वत:पुरता सोडविला आहे.

असोसिएशन तर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!

सेक्रेटरी

विश्रांती स्थान ☺

''काल कामाला ऑफिसमधे का नाही आलात?''

''घरच्या इतर कामांमुळे खूप दमणूक झाली होती सर! म्हणून म्हटलं आज जरा विश्रांती घ्यावी म्हणून.....

''रानडे...विश्रांतीसाठी घरी कशाला राहायला हवं होतं-ऑफिसला दांडी मारून? इथेपण तुमची दिवसभर विश्रांतीच असते ना?''

मधु रानडे (नाशिक)
मोबा :९८५०९१४२७०

## निवृत्ती आहेच कोठे? सर्वत्र आनंदच आहे

आयुष्याच्या ऐन उमेदीत शिक्षण व शारीरिक बाल यांच्या शिदोरीवर व्यक्ती नोकरीला लागते. नोकरीचा अर्थ वरिष्ठांची व व्यवस्थापनाने सांगितलेले काम त्यांच्या मनाप्रमाणे व अपेक्षेप्रमाणे पार पाडणे. प्रत्येक व्यक्ती तिच्या कुवतीप्रमाणे हे काम करते. यामध्ये स्वत:च्या मताला फारशी किंमत नसते. वरिष्ठांचे नेहमीच बरोबर असते, असे समजून न कुरकुरता हे काम करावे लागते. तसे न केल्यास त्याचा उपद्रव होऊन मानसिक व शारीरिक कष्ट होतात. बऱ्याच जणांच्या बाबतीत नोकरीतील बढती, बदली, चढउतार, न्याय-अन्याय नोकऱ्या बदलणे इ. गोष्टी घडत जातात. एकाद्यावेळी व्यक्ती व व्यवस्थापन यांचे सूर जुळतातही. नोकरी करण्यात कामाच समाधान आहे, आनंद आहे असा भास होतो. त्यामुळे काहींना फायदा होतो, तर काही व्यक्ती भरकटत जातात. नोकरीच्या विश्वात व्यवस्थापन आपला धूर्तपणे उपयोग करून घेते. शासकीय नोकरीत ५८ व निमशासकीयमध्ये फार तर ६० वर्षापर्यंत प्रत्येक व्यक्तीला निवृत्त हे व्हावेच लागते.

नोकरीत असताना व्यक्तिगत विकास, कौटुंबिक सुख आपल्या गरजेपोटी व्यक्ती विसरते व अधिकाधिक सुरक्षिततेच्या शोधात राहते. नोकरीतील बदली अस्थैर्य व मनाचा कोंडमारा यामुळे मानसिक शांती बिघडते. त्यामुळे व्यक्ती अधिक कमकुवत बनत जाते. स्वत:च्या विकासात वावच मिळत नाही. निवृत्तीपर्यंत या गोष्टी होत राहातात. याचा परिणाम म्हणजे निवृत्तीनंतर काय? असे वाटू लागते. जीवनाचा मोकळेपणा एकदम जाणवतो व या कटू सत्यापुढे व्यक्ती हतबल बनते. मित्र हो! निवृत्ती पूर्वीच्या जीवनात मिळविलेल्या आनंदाचा साठा कसा लुटता येईल ते पाहायला हवे.

ज्याप्रमाणे आपण निरनिराळ्या योजनाखाली जसे बँकेत पैसे ठेवतो व आपल्या गरजेच्या वेळी वापरतो, त्याप्रमाणेच प्रत्येक व्यक्तिने आपणास निवृत्तीपूर्वी मिळालेला आनंद साठवून आपल्या गरजेच्या वेळी वापरावा. विशेषत: निवृत्तीनंतर याचा अधिक उपयोग होतो. त्यामुळे जीवनातील नैराश्य निश्चितच टाळता येते.

प्रत्येक व्यक्तिची आनंद घेण्याची एक कल्पना असते. जी कृती करताना आपले तन-मन पुलकित होते, आपण स्वत:ला जेव्हा विसरतो व त्या आनंदात झोकून देतो, तो खरा निर्भेळ आनंद होय. प्रत्येक व्यक्तिचा आनंद निरनिराळ्या गोष्टीत दडलेला असतो. सात्त्विक आनंदच चिरकाल टिकतो.

काही व्यक्तिंना खेळ आवडतात. बैठ्या खेळामध्ये बुद्धिबळ, कॅरम, पत्ते तर मैदानी खेळामध्ये क्रिकेट, टेनिस, हॉकी, इ. खेळ स्वत: खेळावेत किंवा प्रत्यक्ष दूरदर्शनवर खेळ पाहाण्याचा आनंद घ्यावा. काहींना संगीत आवडते तर काहींना सोशल वर्क आवडते, काहींना वादविवाद स्पर्धा ऐकणे व त्यात भाग घेणे आवडते. काहींना फिरायला जाणे, सहलीत भाग घेणे, निसर्गात रममाण होणे आवडते. शेतीकाम, बागकामही पुनर्निर्माणाचा आनंद देतात. चित्रकला, शिल्पकला, अश्या प्रकारच्या कला वेगळाच आनंद देतात. काहींना अध्यात्मातील चिंतन, विचार, भक्तीमार्ग आवडतो. तर काहींना शिक्षण संस्थेमध्ये काम करणे आवडते.

निवृत्तीनंतर आनंदी राहायचे असेल तर व्यक्ती तितक्या प्रकृती या न्यायाने आपणाला आवडणारा मार्ग स्वीकारावा. ज्याप्रमाणे उगमापासून झरा एकदम सागर बनत नाही तद्वतच हा आनंद निवृत्तीनंतर एकदम मिळत नाही. त्यासाठी सुरूवातीपासून 'आवड असेल तर सवड' मिळते या न्यायाने सवड काढून आनंदाचा साठा वापरावा.

प्रत्येकाने, प्रत्येक आवडणाऱ्या कलेचा अभ्यास करावा. शारीरिक, मानसिक, आर्थिक तसेच कष्टाची तयारी असावी लागते. कलेतील बारकावे समजून घेतल्यास आनंद द्विगुणीत होतो. तरी या आनंदामध्ये काही बंधने जरूर आहेत. कारण हा आनंद आपल्या पंचेद्रियानीच ग्रहण करावा लागतो. दृश्यांचा डोळ्यांनी, ऐकण्याची कानांनी, स्पर्शाचा त्वचेने, चवीचा जिभेने व वासाचा नाकाने त्यामुळे निवृत्तीच्या वेळी ही सर्व इंद्रिये व्यवस्थित असणे गरजेचे ठरते.

एखादे इंद्रिय निकामी झाल्यास इतर इंद्रियांना वापरात आणण्यासाठी आनंदात वैविध्य आवश्यक ठरते. उदा. क्रिकेट पाहाण्याचा आनंद दृष्टी अधू झाल्यास समालोचन ऐकून कानांद्वारे घ्यावा लागतो. प्रत्येकाने स्वत: आनंदी राहाण्यासाठी, दुसऱ्यास आनंदी करण्याची कला आत्मसात केली पाहिजे.

तर मित्र हो! 'भोगात सुख नसून ते त्यागात असते' या गोष्टीचे चिंतन, मनन व आचरण केल्यास आनंदाचा ठेवा आपल्या जवळच सापडेल. आपण व्यवहारी जगात जे जे काही मिळवतो ते स्वत:साठीच न ठेवता इतरांना देण्याचे ठरवल्यास आपण आपल्या कुटुंबाचे कल्याण करू शकतोच, शिवाय समाजाचे ऋण समजून त्याची परतफेड केल्याचा आनंद काही वेगळाच मिळतो. निवृत्ती आहेच कोठे, सर्वत्र आनंदाच भरलेला आहे याचा प्रत्यय सर्वांना येईल व शेवटपर्यंत आपले आयुष्य सुखी होईल.

- एस.व्हि.दळवी, अंधेरी (प)

८१/१३ भ्रमणध्वनी - ९८६९५५३७२५

### व्यायाम

डॉक्टर - ''हं काय म्हणते आता तब्येत! रोज पायी फिरायला सुरूवात केली की नाही? तुमच्यासाठी चालणे हाच एक उत्तम व्यायाम आहे.''

पेशंट:- हो डॉक्टर साहेब! आता मी नियमित सकाळी व संध्याकाळी सुद्धा Morning walk घेत असतो.

वसंत धुपकर (पुणे)

फोन नं : (०२०)२०२५५४०८

# खरा सावरकर मार्ग

२६ फेब्रुवारी१९६६ हा स्वातंत्र्यवीर सावरकरांचा आत्मार्पण दिन. सावरकर पुण्यतिथीच्या निमित्ताने नवी दृष्टी व नवा विचार देणारा हा विशेष लेख.....संपादक

महापुरुषांचे विचार व कर्तृत्व पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावे आणि त्यापासून सतत स्फूर्ती मिळत राहावी म्हणून ठिक-ठिकाणी महापुरुषांची स्मारके उभारली जातात. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ नगरा-नगरातील विविध उद्याने, चौक, रस्ते, महामार्ग, पूल तसेच रेल्वेस्थानके-विमानतळ आदींना महापुरुषांची नावे दिली जातात. मध्यवर्ती ठिकाणी त्यांचे पुतळेदेखील उभारले जातात. त्यांच्या नावाने विविध स्पर्धांचे, प्रदर्शनांचे, व्याख्यानमालांचे, नाट्य-चित्रपट महोत्सवांचे किंवा रक्तदानासारख्या समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन केले जाते. प्रत्येक गावातून किंवा शहरातून गांधी-नेहरु-पटेल-शिवाजी-विवेकानंद यांच्या नावांचे रस्ते सर्रास पाहावयास मिळतात. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या नावाचे रस्तेदेखील अनेक गावातून आडळतात. महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईतील पूर्वीच्या 'कॅडेल रोड'चे काही वर्षांपूर्वी 'वीर सावरकर मार्ग' असे नामांतर झालेले सर्वांना माहीत आहेच.

हे सर्व पाहिले आणि जरा खोलवर जाऊन विचार केला तर एक गोष्ट मनाला जाणवते की एखाद्या रस्त्याला किंवा महामार्गाला सावरकरांचे नाव देणे हे कृतज्ञतादर्शक असले तरी हे त्यांचे अगदी मर्यादित वा लघुतम स्मृतिरूप आहे. हे काही त्यांच्या स्मृतीस उचित न्याय किंवा योग्य मान देणे नव्हे; केवळ रस्त्यांना सावरकरांचे नाव दिले की आपले कर्तव्य पूर्ण झाले का? त्यामुळे सावरकरांचे विचार जनतेपर्यंत पोहोचतील का याचाही आपण विचार करावयास हवा. म्हणूनच खरा सावरकर मार्ग कोणता ते आपण जाणून घ्यावयास हवे.

खरा सावरकर मार्ग हा सरळ, सपाट, गुळगुळीत, विनात्रासाचा नाही; तर तो कंटकाकीर्ण म्हणजेच काट्याकुट्यांचा-काटेरी आणि खाच-खळग्यांचा खडतर असाच आहे. तो मार्ग अनेक संकटांशी नि आव्हानांशी टक्कर देणारा आहे. सावकरांचे तर्कशुद्ध, प्रखर, धगधगते सडेतोड व सर्वार्थाने क्रांतिकारक असलेले राजकीय आणि समाजसुधारक विचार सांगणारा खरा सावरकर मार्ग आहे. ते विचार जो पचवू शकेल नि आचरणात आणू शकेल तोच खऱ्या सावरकर मार्गाने जाऊ शकेल. पतीच्या निधनानंतर त्याच्या धगधगत्या चितेत उडी घेऊन स्वत:ला स्वेच्छेने जाळून घेण्याची म्हणजेच सर्वस्वार्पण करण्याची पूर्वी प्रथा होती. ते 'सतीचे वाण' होते. हे सतीचे वाण सावकरांनी पत्करलेले होते देशासाठी-देशस्वातंत्र्यासाठी.

''की घेतले व्रत न हे अम्ही अंधतेने।<br>
लब्ध प्रकाश इतिहास निसर्ग माने।।<br>
जे दिव्य-दाहक म्हणूनि असावयाचे।<br>
बुद्ध्याचि वाण धरिले करि हे सतीचे।।''

-असं स्वत: सावरकरांनीच म्हटले आहे. हे सतीचे वाण जो पत्करू शकेल तोच खऱ्या सावरकरमार्गाने जाऊ शकेल. सावरकरपथ हा खरा अग्निपथ आहे. देशाचं भाग्य-भविष्य उजळण्यासाठी स्वत:ला जाळून घेण्याची ज्याची सिद्धता आहे तोच सावरकर पथाने मार्गक्रमण करू शकेल. सावरकर म्हणजे संकटे. सावरकर म्हणजे आव्हाने अन् प्रतिआव्हाने. सावरकर म्हणजे पराकोटीचा स्वार्थत्याग. अदम्य देशप्रेम. जाज्ज्वल्य स्वातंत्र्याकांक्षा अन् सीमेची पराक्रमी वृत्ती. सर्व संकटांवर-आव्हानांवर मात करणारी विजिगीषु वृत्ती. या सर्व गोष्टी सावरकरांच्या नावाशी अतूटपणे जोडलेल्या आहेत. खऱ्या सावरकर मार्गाने चालत जाणं हे येरागबाळ्याचं कामच नाही. तर तेथे पाहिजे त्याच जातीचे, त्याच कुलाचे, त्याच वृत्तीचे, पूर्णपणे त्याच विचारांचे अन् त्यानुसार प्रत्यक्ष आचरण करण्याची सिद्धता असणारे म्हणजेच खरे सावरकरशिष्य-सावरकर अनुयायी. अशा शिष्यांच्या वर्तनानेच खरा सावरकर मार्ग घडतो.

'विश्वाचिया अखिल मंगलधारणाला' हे अंतिम ध्येय मानून स्वातंत्र्यवीर सावरकर मार्गक्रमण करीत असले तरी प्रथम स्वदेशाचे स्वातंत्र्य गाठणे अत्यावश्यक असल्यामुळे त्यासाठी ते 'राष्ट्रस्वतंत्रता ध्येयं, यथा साध्यं च साधनम्' असे म्हणून त्यासाठी सशस्त्र क्रांतीचा मार्ग अनुसरतात आणि स्वत:च प्रदीप्त केलेल्या यज्ञकुंडात-स्थंडिलात स्वत:च्या देहाची समिधा बनवून सर्वस्वाचा होम करण्यास सिद्ध होतात. स्वदेशाला-हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही ते अबाधित राहावे व देश समर्थ, स्वावलंबी, स्वयंपूर्ण, बलाढ्य व्हावा याची प्रेरणा देणारे सावरकरी विचार खऱ्या सावरकर मार्गाने जातात; किंबहुना या सावरकरी विचारांनी खरा सावरकर मार्ग बनतो. केवळ एकाद्या रस्त्याला किंवा महामर्गाला सावरकरांचे नाव देऊन खरा सावरकर मार्ग बनत नाही हे सत्य आपण जाणून घेतले पाहिजे.

आता 'शरण नाही रण आणि मारिता-मारिता मरण' म्हणजेच रणांगणात, प्रत्यक्ष युद्धात शत्रूला मारता मारता मरण पत्करण्याचे आवाहन करणारे नाटककार सावरकर, किंवा 'शत्रूशी मारिता-मारिता मरेतो झुंजेन' ही प्रतिज्ञा घेणारे क्रांतिकारक सावरकर; 'समतेच्या-ममतेच्या सुजनरक्षणाला। भव्य भीषणाला, हिंदुजाति ही चालली रणाला।।' असा संदेश देणारे कविश्रेष्ठ सावरकर; रोटीबंदी-बेटीबंदी-वेदोक्तबंदी-समुद्रबंदी-स्पर्शबंदी-शुद्धिबंदी-व्यवसायबंदी अश्या सात बेड्यांमध्ये, सप्तश्रृंखलांमध्ये अडकलेल्या हिंदुसमाजाला त्यातून मुक्त करू पाहणारे समाजसुधारक निबंधकार सावरकर; तसेच स्वतंत्रतेला साक्षात् देवी कल्पून स्वदेशस्वातंत्र्यार्थ तिच्याच ठायी स्वत:चे वक्तृत्व-वाग्वविभव पूर्णपणे अर्पण करणारे स्वातंत्र्यभाट सावरकर अशी सावरकरांची विविध रूपे खऱ्या सावरकरमार्गाने जाणाऱ्यास भेटतात व मार्गदर्शन करतात. देशाचे भविष्य उजळविणारा, देशाला सतत प्रगतिपथावर ठेवणारा, देशबांधवांना सतत प्रेरणा देणारा सावरकरी विचार हाच खरा सावरकर मार्ग होय याची जाणीव ठेवून त्या मार्गाने जाण्याचा प्रयत्न आपण करावा हेच सर्वार्थाने उचित होय.

क्रांतिसेन रामचंद्र आठवले
**भ्रमणध्वनी : ०९८६९९५४१६६१**

## कळ्या आठवणींच्या

आठवणींच्या कळ्या घेऊनी
फिरतो जागो जागी मी
वाट पाहातो फुले तयांची
फुलतील का कधी काळी ती

वाडा घर ते जुनं पुराणे
फिरतो शोधित गावामध्ये
घारीसम ती नजर भिरभिरे
दहा दिशांना अधीर मनाने

चौसोपी घर गावाकडचे
जेव्हा भेटे नव्या रूपाने
कळी अचानक उमलून येते
गंधाळीत मन पुन्हा नव्याने

शाळकरी कुणी दोस्त भेटता
रस्त्यामध्ये जाता येता
निर्झर वाहे संवादाचा
स्वैर खळ खळ त्या गप्पांचा

मिटलेल्या ह्या बाकी कलिका
ओंजळीत मागेच राहती
भविष्यात तरी फुलतील का त्या
भावुक डोळे वाट पाहती

**- आर. जी. कडवेकर,** सातारा

८१/१२ भ्रमणध्वनी - ९३७२६७३९८४

## वाटते सानुले

वाटते सानुले बाळ पुन: मी व्हावे
कधी हसूनी, कधी रडूनी
सगळ्यांचे लक्ष केंद्रीत करावे
आईची ती ऊब मायेची
पुन: पुन: अनुभवावी
बाबांचे ते बोल बोबडे
पुन: पुन: ऐकावे
छोट्या छोट्या पावलांना
गुदगुदल्या करूनी
ताईने पुन: पुन: हसवावे
दोन्ही पायांची मांडी घालूनी
आजीने हलवून हलवून जोजवावे
दोन्ही हातांच्या घडीत बसूनी
आजोबांसवे हिंडावे
खोटे खोटे रडूनी
सगळ्यांना घाबरवावे
तर कधी बाललीलांनी
सगळ्यांना रिझवावे
परावलंबी असलो तरी
सगळ्यांना वेठीस धरावे
वाटते सानुले बाळ पुन: व्हावे

**- सौ. सुषमा तिळवे, फोंडा गोवा**

८०/१३ मो. - ९८२३०५५७५१

## *वळण*

येऊन जातात जीवनात अशी वळणे आकलन न होणारी

गोंधळते मग मन उदास होते पाहते स्वप्ने मग धूसर होणारी

कधी जगणे असते स्वत:साठी आणि घरच्यांसाठी

जे काही मिळते, असते ते मग सगळ्यांसाठी

असे एकत्रित जमणे, जपत जाते मनात नाती चिरंतर टिकणारी

येऊन जातात जीवनात.....

अशा जुन्या पिढीत, मी जगलो, वाढतच गेलो

कसे समजावू ते आत्ताच्या पिढीला, मनाशीच वादतच गेलो

पिढ्यापिढ्यांतील अंतरे अशी, नसते मनात जरी, असतात परस्परांना दुरावणारी

येऊन जातात जीवनात.....

काय ह्या पिढीने मिळविले, विचार मनात मग येतो

जो तो तेव्हा गडबडीत, स्पर्धेत धावताना मग दिसतो

वेळ परस्परांकरिता न देऊ शकण्याची, सल असते मनात सदैव बोचणारी

येऊन जातात जीवनात अशी वळणे आकलन न होणारी

**- रमेश त्रिं. इंगोलीकर,** अमरावती

मो. - ९८२३२११८६०

८२/१३

**Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008**
**SSPO Pune under Postal Concession Register No. PNCW/M-144/2014-2016**
**Permission to Post at Market Yard P.S.O. on 25th of each Month and published on 25th of the month**
Postage prepaid in Cash at Market Yard Post Office

## खड्ड्यांमुळे रस्त्यांची झालेली दुर्दशा

एक आडवा न् उभा खड्डा रस्त्यावर पडला गं
खड्डा आडवा आला मधे नि पाय माझा मोडला गं
नक्को राणी नक्को रडू, खड्ड्यामध्ये नक्को पडू
इथ न् नको तिथन् जाऊ, रस्ता मिळतोय का पाहू?
का पडत्यात.......... एक आडवा......

लंगडत गेले मी पाहुण्यांपुढे झाली वधुपरीक्षा सुरू
मुलगा म्हणाला या लंगडीला का बरं मी पत्करू?
पायाबरोबर लग्नही मोडलं खड्डा नडला गं
खड्डा आडवा आला............ ||१||

डॉक्टर गाठला नि पायावर माझ्या मी उपचार केले सुरू
लग्नाळू डॉक्टर हळूच म्हणाला लग्नच आपण करू
पाय झाला बरा नि झक्कास नवरा पदरात पडला गं
खड्डा आडवा आला............ ||२||

**उज्ज्वला कुलकर्णी**, पुणे
मो. ९८९०९४६६८४

## शून्य

शून्य म्हणजे अभाव. अभाव म्हणजे काही नाही
पण शून्या-शून्यातच आहे सर्व काही....
कबीराला हवा होता या शून्य मंडलात प्रवेश
कारण तिथे होई रोम रोम प्रकाशित....
ऐकू येई तिथे, अनाहत नादाचं मधुर संगीत
तिथं दृष्टी होई आध्यात्मिक, अनंत, ज्ञानमय...
सारं शरीरच होई दिव्य प्रकाशमय...
म्हणून शून्यात जरी असला अभाव
तरी त्यात त्याला आहे अमूल्य भाव....
शून्याला अर्थ आहे विशाल, आकाशाएवढा
शून्यातच झाला, तत्त्वज्ञानाचा अभ्यास गाढा...
शून्याची दिसे महती, अंकाच्या पुढे असण्यात
विज्ञानाने सारेच लागले शोध शून्यात....
शून्यातूनच आले ओठांवरी, अनंत शब्द
रंगले अंतरंगी मन, ध्यानातच झाले सर्व निशब्द...
साधनेच्या प्रारंभी, हृदयाकाशी ओंकार उत्पन्न
तोचि ब्रह्म निर्गुण सर्वात्मा, आहे ते एकच शून्य!

**सतीश नी. केतकर, कल्याण (पश्चिम)**
७४/१३ फोन - ९७६९५६२३१०

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 25446837
Timings : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.